# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०२५
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष पंचविसावे
अंक आठवा



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
₹ ३०,०००/-

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
₹ २०,०००/-

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦ऑगस्ट २०२५ ♦वर्ष पंचविसावे ♦अंक आठवा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस

## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **श्रद्धांजली** | ७ |
| **विशेष** | १० |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| आकु आकु | १२ |
| अधर्मकांड | २२ |
| पडछाया | ३२ |
| कोरोना नंतरचे उद्योगविश्व | ३८ |
| द सीक्रेट फ्रेन्ड | ४८ |
| ॲन इनकम्प्लीट लाइफ | ५६ |
| **अभिप्राय** | ६० |
| **दिनविशेष** | ६२ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

‘मेहता मराठी ग्रंथजगत’ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

‘Mehta Marathi Granth Jagat’ monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## बंध मैत्रीचे

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी ‘मैत्री दिवस’ साजरा केला जातो. जागतिक पातळीवर हा दिवस साजरा करत असल्याचं पाहायला मिळतं. १९५८पासून पेरूग्वेमध्ये हा दिवस साजरा केला जाऊ लागला. हा दिवस आता जगभरात ‘जागतिक मैत्री दिवस’ म्हणून साजरा केला जातो. परस्परांमधील स्नेहभाव, आस्था व्यक्त करण्यासाठी या दिवसाची सुरुवात झाली. मैत्रभाव, नातं यात दृढता यावी, ते चिरंतन टिकावं यासाठी या दिवशी शुभेच्छा देऊन हा दिवस जगभरात साजरा केला जातो.

मैत्री हे एक शब्दातीत स्वरूपाचं नातं आहे. इतिहासकाळात डोकावून पाहिल्यास आपल्याला वेगवेगळ्या मैत्रीच्या नात्यांची उदाहरणं नजरेस येतात. पुराणकाळातील कृष्ण-सुदामा, कर्ण-दुर्योधन यांसारखी मैत्रीची उदाहरणं आजही प्रसिद्ध आहेत. इतिहासकाळातील छत्रपती शिवराय आणि त्यांचे मैतर असलेले मावळे, शंभूराजे-कवीकलश ही नाती आपल्याला सहज आठवतात. मैत्री ही भावना, हे नातं शब्दांत व्यक्त करता

येणं कठीणच, मात्र प्रत्येक जण आपल्या पातळीवर हे नातं जपण्याचा प्रयत्न करत असतो.

आपले नातेवाईक निवडायची मुभा आपल्याला नसते. मात्र मित्र-मैत्रिणी निवडायची संधी मात्र असते. या संधीचा कोण कसा फायदा घेतो यावर त्या मैत्रीरूपी नात्याची जडणघडण होते. मैत्री हे निवडलेलं नातं असतं ते महत्त्वाचं असतं. दोन मित्र त्यांची ओळख, शाळा, कॉलेज, नोकरीचं ठिकाण कुठंही होऊ शकतं. शालेय वयातील मैत्री, कॉलेजच्या दिवसातील मैत्री आणि व्यावसायिक ठिकाणी वावरत असतानाची मैत्री या तिन्हींमध्ये थोडाफार फरक असला तरी 'मैत्रभाव' सारखाच असल्याचा अनुभव येत असतो.

'मैत्री' हे नातं प्रत्येक जण जपत असतो. प्रा. ना.सी.फडके यांच्या 'मित्र' या लघुनिबंधात मैत्री या नात्यावरील भाष्य वाचायला मिळतं. काही वर्षांपूर्वी हा लघुनिबंध बालभारती मराठीच्या पुस्तकात अभ्यासाला होता. कवी, लेखक, गीतकार या सर्वांनाच मैत्रीच्या नात्याची भुरळ पडली आहे हे जाणवतं.  साहित्याच्या क्षेत्रात कथाकार शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार यांची मैत्री प्रसिद्ध आहे. तिघेही जण एकत्र कथाकथनाच्या कार्यक्रमाच्या निमित्तानं जात असत. कवी वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, विंदा करंदीकर यांचीही मैत्री याच प्रकारची; हे तिघेही एकत्र काव्यवाचनाच्या कार्यक्रमासाठी जात असत.

या महिन्यात रविवार ३ ऑगस्ट रोजी 'जागतिक मैत्री दिवस' जगभर साजरा करण्यात आला. त्या निमित्तानं हा दिवस मैत्रभाव, मैत्रीचं नातं याबद्दल कृतज्ञता म्हणून मित्र-मैत्रिणींनी परस्परांना शुभेच्छा देऊन हा दिवस साजरा केल्याचं पाहायला मिळतं.

आमच्या सर्व वाचकांना जागतिक मैत्री दिनाच्या शुभेच्छा. पुस्तकरूपी मित्रासोबत मैत्री करा आणि आनंदी राहा. एवढंच या निमित्तानं सांगावंसं वाटतं.

मराठी साहित्यात, ग्रामीण कथेच्या प्रांतात पाटीलकी करणारे लेखक म्हणजेच शंकर पाटील. कोल्हापूर जिल्ह्यातील पट्टणकोडोली गावात पाटील यांचा जन्म ८ ऑगस्ट, १९२६रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण पट्टणकोडोली, गडहिंग्लज येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथील

राजाराम महाविद्यालयात झाले. प्रा. द.सी.पंगू, प्रा. ना.सी.फडके यांसारखे प्राध्यापक त्यांना अध्यापन करत असत.

विजया राजाध्यक्ष, बाबा कदम, रणजित देसाई, प्रल्हाद वडेर, व.ह.पिटके, बाबा पाटील हे त्यांचे महाविद्यालयीन मित्र होते. यातील सर्वच मंडळी मराठी साहित्य क्षेत्रात प्रसिद्ध लेखक, समीक्षक, कवी म्हणून नावारूपाला आली. साहित्याबद्दल प्रेम असणारा हा मित्रमंडळींचा समूह आणि त्यांच्या साहित्यविषयक चर्चा याचेच फलित म्हणजे ही सर्व मंडळी प्रसिद्ध साहित्यिक म्हणून आजही ओळखली जातात.

मराठी नवकथेचे एक शिलेदार म्हणून शंकर पाटील यांची ओळख आहे. त्यांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील ग्रामीण जीवनाचे जिवंत चित्रण साहित्यातून मराठी वाचकांपर्यंत पोहोचवले. 'धिंड', 'ताजमहालमध्ये सरपंच', 'वळीव', 'गारवेल' इ.सारखे कथासंग्रह. 'टारफुला'सारखी ग्रामीण गावगाड्याचेचित्रण असणारी कादंबरी. 'शापित वास्तू' हा नॅथनिएल हॉथॉर्न यांनी लिहिलेल्या अमेरिकन कादंबरीचा अनुवादही पाटील यांनी केला. मराठी तमाशापट प्रधान चित्रपटांचे संवाद व पटकथा लेखनही त्यांनी केले. दोन वगनाट्य, सतरा कथासंग्रह, एक कादंबरी, एक अनुवादित कादंबरी एवढी साहित्य संपदा पाटील यांच्या नावावर आहे.

मराठी ग्रामजीवनाचे संवेदनशीलपणाने चित्रण करणाऱ्या या कथाकाराच्या जन्मशताब्दी वर्षाला ८ ऑगस्ट, २०२५पासून सुरुवात होत आहे. या वर्षात या लेखकाच्या स्मृतींना उजाळा देणारे आणि साहित्य विषयक असे काही उपक्रम राबवण्याचा आमचा मानस आहे. आमच्या ग्रंथसूचीस समृद्ध करण्याऱ्या कथाकार शंकर पाटील यांना ९९व्या जन्मदिवसानिमित्त विनम्र अभिवादन!!

आखिल
मेहता

# श्रद्धांजली

## विज्ञानप्रेमी डॉ. अरुण मांडे कालवश



पुणे : डॉ. अरुण विनायक मांडे हे व्यवसायाने डॉक्टर होतेच; परंतु साहित्यक्षेत्रातही विज्ञानाच्या आधारावर अनेक प्रकारचं लेखन त्यांनी केलं. आकाशवाणीसाठी नभोनाट्य लेखन, कुमारवयातील मुलांसाठी विज्ञानपर पुस्तकं, एकांकिका लेखन, वर्तमानपत्रात आरोग्यविषयक स्तंभलेखन – कथासंग्रह – कादंबरी – अनुवादित लेखनही त्यांनी केलं. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेल्या त्यांच्या 'विज्ञान गमती' आणि 'विज्ञान जमती' या दोन विज्ञानपर पुस्तकांना १९९४-९५च्या महाराष्ट्र शासन पुरस्काराने गौरवण्यात आलं. १९९४ ते २०१०पर्यंत असंख्य पुरस्कारांनी त्यांना पुरस्कृत करण्यात आलं. डॉक्टरांच्या या लिहित्या हातानं जवळजवळ ४० पुस्तकं लिहून प्रकाशित केली. डॉक्टरीपेशा असूनही साहित्यक्षेत्रात स्वत:चा असा वेगळाच ठसा उमटवत असतानाच, २८ जुलै, २०२५रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

अशा विज्ञानप्रेमी डॉ. अरुण मांडे यांना मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

◆

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*
amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!


**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली,
वाचायला सोपी,
सोयीस्कर
– थेट तुमच्या
कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि
ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
स्वामी
रणजित देसाई
ebook
available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# विशेष


‘टारफुला’कार अशी ओळख असलेले; ८ ऑगस्ट, १९२६ या दिवशी पट्टण-कोडोली, हातकणंगले तालुका, कोल्हापूर इथे जन्मलेले आणि त्याचबरोबर १९६४पासून स्वत:चा असा खास वाचकवर्ग निर्माण करणारे मराठीतील प्रख्यात, दिग्गज लेखक ‘शंकर बाबाजी पाटील’ यांच्या जन्मशताब्दी वर्षाला सुरुवात झाली आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित ‘टारफुला’ कादंबरी – ‘वावरी शेंग’, ‘धिंड’, ‘ताजमहालमध्ये सरपंच’, ‘पाटलांची चंची’, ‘गारवेल’ इ. कथासंग्रह – ‘लवंगी मिरची कोल्हापूरची’, ‘कथा अकलेच्या कांद्याची’ ही नाटकं – ‘शापित वास्तू’ ही अनुवादित कादंबरी इ. लेखन प्रसिद्ध आहेच; परंतु त्या व्यतिरिक्त ‘पिंजरा’, ‘एक गाव बारा भानगडी’, ‘सरपंच’ इ. चित्रपटांसाठी पटकथा लेखक म्हणून त्यांनी केलेलं काम पुरस्कारांनी पुरस्कृत झालं आहे. ग्रामीण भागात जन्मल्यामुळे, ग्रामीण मातीचा गंध त्यांच्या एकूणच लिखाणांतून वाचकांपर्यंत पोहोचतो. ग्रामीण जीवन आणि गावगाड्यातील सामाजिक व आत्मिक संघर्ष याचं यथार्थ चित्रण त्यांच्या लेखणीतून पाहायला



मिळतं. साठोत्तरी कालखंडात उदयास आलेल्या नवकथेचे शिलेदार असंही त्यांना संबोधलं जातं. म्हणूनच अष्टपैलू साहित्यिक शंकर पाटील यांचं हे जन्मशताब्दी वर्ष साजरं करण्यासाठी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे वर्षभरात खास उपक्रम घेण्यात येणार आहेत. हे उपक्रम शंकर पाटलांच्या साहित्याला नव्या पिढीच्या वाचक-लेखकांपर्यंत पोहोचवण्याचं काम करतील ही खात्री आहे. यासंबंधी वाचकांना लवकरच कळवण्यात येईल; परंतु याबद्दलचे अपडेट्स जाणून घेण्यासाठी आमच्या फेसबूक पेजला फॉलो करा आणि शेअर करा. सुजाण वाचक म्हणून ओळखीच्या प्रत्येकापर्यंत शंकर पाटलांचं साहित्य पोहोचवण्याची आपण सगळेच जबाबदारी घेऊ या! त्यांच्याच 'पाऊलवाटा' सर करत 'भेटीगाठी'साठी भेटू या लवकरच..!

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## आकु-आकु

**थॉर हेयरडाल**

अनुवाद
**श्रीया भागवत**

*‘आकु -आकुं’चे चमत्कारी गूढ ,*
*मानवी मनातील भीतीचे सैतानी धूड*

### जगाचे टोक गाठायला निघालेली शोधमोहीम

मला आकु-आकु नव्हता.

आकु-आकु काय, हेही मला ठाऊक नव्हते. त्यामुळे मला आकु-आकु असता, तरीही त्याचा वापर कसा करायचा, हे मला ठाऊक नव्हते.

‘ईस्टर बेटा’वरील प्रत्येक समजूतदार माणसाचा आकु-आकु आहे. मी तिथे गेलो तेव्हा मलादेखील तो मिळाला; पण सध्या त्या अद्भुत ठिकाणी जाण्यासाठी मोहिमेच्या तयारीत मी होतो, त्यामुळे कदाचित मला आकु-आकु नव्हता. आकु-आकु नसल्यामुळे बहुधा तिथे जाणे मला इतके त्रासदायक वाटले. परतीचा प्रवास त्यामानाने सुखद होता.

‘ईस्टर बेट’समूह हा जगातील सर्वांत एकांड्या बेटांपैकी एक आहे. त्यांना दृष्टीस पडणारे सर्वांत जवळचे भूगर्भ म्हणजे चंद्र आणि ग्रह-तारे. त्यांच्या आजूबाजूला कुठेही त्याहून जवळ जमीन अस्तित्वात आहे, याची खात्री करण्यासाठी इतर कोणाहीपेक्षा त्यांना सर्वांत जास्त अंतर कापावे लागते. त्यामुळे त्यांच्या स्वत:च्या जगातील देशांच्या आणि शहरांच्या नावांपेक्षा त्यांना ग्रह-ताऱ्यांची नावे माहिती असण्याची शक्यता जास्त आहे. सूर्याच्या पूर्वेला आणि चंद्राच्या दक्षिणेला स्थित ह्या छोट्याशा बेटावरील मानवांना जगातील सर्वांत विचित्र कल्पना सुचली. ही कल्पना कशी आणि का सुचली असेल, हे कोणालाच ठाऊक नाही कारण तो फार फार पूर्वीचा काळ होता.

‘कोलंबस’ काही गोऱ्या लोकांना सोबत घेऊन नवीन जगाच्या अर्थात अमेरिकेच्या शोधात निघाला त्याही आधीचा हा काळ आहे. मानवजातीला समुद्र पार करून देणारा तो पहिला माणूस आहे, असे आपण मानतो. पण त्याच्याही कित्येक वर्षे आधी, जेव्हा आपल्या वंशजांना जग हे ‘जिब्राल्टर’ येथे संपते असे वाटत होते, त्या काळी इतरत्र कुठे तरी असे ‘जलयात्री’ होते जे दक्षिण अमेरिकेच्या पश्चिम बाजूच्या उजाड किनाऱ्यावरून ‘प्रशांत महासागर’ ओलांडावयास निघाले. बरेच दिवस असेच तरंगत राहिल्यावर अखेर त्यांना तिथे किनारा गवसला. ते होते जगातील सर्वांत एकांडे बेट. त्या बेटावर उतरून त्यांनी त्यांच्यासाठी दगडी छिन्नी बनवली आणि ते कामाला लागले. त्यांचे हे काम म्हणजे इतिहासकालीन आकर्षणातील अचंबित करणारा एक अभियांत्रिकी प्रकल्प होता. त्यांनी किल्ले, घरे, बंधारे किंवा मालधक्के, यांतील काहीच बांधले नाही. त्यांनी संपूर्ण वेळ घालवला ते मनुष्याच्या रूपातील महाकाय पुतळे बांधण्यासाठी. हे पुतळे एखाद्या इमारतीइतके उंच आणि रेलगाडीइतके जड होते. त्यांनी थेट डोंगरात

हे पुतळे तासून काढले आणि ते स्थलांतरित करून सबंध बेटावर जागोजागी एकाशेजारी एक असे ठेवून दिले.

त्यांच्याकडे कोणतेही आधुनिक तंत्रज्ञान नव्हते, तर मग हे त्यांनी कसे शक्य करून दाखविले? या प्रश्नाचे उत्तर कोणीच देऊ शकत नाहीत. ती माणसे मातीला मिळाली, पण त्यांनी इतके मनापासून तयार केलेले पुतळे तसेच उभे राहिले. त्यांची मेलेली माणसे त्यांनी ह्याच पुतळ्यांच्या पायथ्याशी पुरली. ते पुतळे बांधत राहिले आणि त्यांच्या लोकांना दफन करत राहिले. मग अचानक एके दिवशी दगडाचा दगडावर होणारा आवाज थांबला आणि सगळीकडे सामसूम झाली. हे इतक्या अचानकपणे झाले, की त्यांची हत्यारे सगळीकडे तशीच पसरलेलीच राहिली आणि अनेक पुतळे अर्धवट अवस्थेत होते. इतिहासाच्या धुक्यामध्ये हे शिल्पकार अचानक नाहीसे झाले.

नक्की काय झाले? 'ईस्टर बेटां'वर असे झाले तरी काय?

माझ्या समोरच्या महासागराच्या प्रचंड नकाशात मी ह्याआधी हजार एक वेळेला केले होते,तसेच पुन्हा एकदा डोके खुपसून बसलो. तो नकाशा फसवा आहे, याची मला खात्री होती; कारण त्यावर प्रत्येक बेट आणि त्याचे नाव ठसठशीत दिसेल,असे दाखवले होते आणि हातांत पट्टी धरली, की समुद्राचे जालीम प्रवाह पार करणे अत्यंत सोपे आहे, असे वाटत होते. पण हकीकत काही औरच होती, हे मला चांगले माहीत होते. आता मला हा समुद्र चांगला माहीत झाला होता. (टीप : कॉन-टिकी जहाजाचा जलमार्ग, त्यांचा कालक्रम आणि त्यांनी भेट दिलेल्या जागा ह्यांचा नकाशा मागच्या पानांवर पुरविण्यात आला आहे.) 'मार्केसास बेट समूहा'त मी जवळपास एक वर्षभर स्थानिक जीवनशैलीत जगलो होतो आणि तिथल्या स्थानिक लोकांच्या दृष्टिकोनातून ती जागा पाहिली होती. तिथेच पहिल्यांदा मी 'टे टेटुआ'च्या शब्दात 'टिकी'ह्या अद्‌भुत मनुष्य देवाच्या कथा ऐकल्या होत्या आणि तिथेच ताडांनी भरलेल्या 'ताहीतीच्या द्वीपसमूहा'मध्ये असताना त्यांचा महान अधिष्ठाता 'टेरीईरु' थोड्या कालावधीकरिता माझा गुरू झाला होता. त्यांनी मला त्यांचा मुलगा मानले होते आणि त्यांची जमात आपलीच समजून वागायचे, कसे हेही शिकवले होते. 'तुआमोटू

बेट'समूहांवर आमचे कॉन-टिकी जहाज होते. प्रशांत महासागराच्या खाऱ्या पाण्याचे प्रवाह हे एखाद्या पट्टा वाहकाप्रमाणे दक्षिण अमेरिकेहून निघालेल्या मुशाफिरांना बरोबर आणून इथेच सोडतात, हेही आम्हाला तेव्हा ध्यानात आले. ती बेटे कितीही एकांडी असली, तरीही 'रेड इंडियन्स'च्या 'बाल्सा लाकडा'पासून बनवलेल्या जहाजांना तिथे पोहोचणे अगदी सहज शक्य झाले.

तिथे 'गालापागोस'च्या बेटांवरील जंगलात माझ्या आणखी काही विचित्र आठवणी आहेत. 'कॉन-टिकी' जहाजातून आलेलो असताना आम्ही तिथेच जाऊन पोहोचणार होतो. या बेटसमूहाने आणखी काय गुपिते दडवून ठेवली आहेत, हे पाहायला मी दुसऱ्या एका मोहिमेसोबत गेलो होतो. ह्या बेटावर महाकाय सरडे आणि प्रचंड कासवे यांच्या जोडीनेच मला अलाउद्दीनचा दिवा सापडला. वाळवंटातील 'काटेरी निवडुंगा'च्या मुळापाशी मला पुराणकाळातील बरण्यांचे असंख्य तुकडे आणि कचरा असे पुरलेले सापडले. अलाउद्दीनचा दिवा घासल्यावर त्यातून भूतकाळातील जीन बाहेर पडत असे तसेच हे तुकडे घासल्यास पूर्व क्षितिजावर पुरातन जहाजांची शिडे दिसत आहेत, असा भास व्हायचा. 'इन्का इंडियन्स'च्या जहाजांच्या ताफ्यातील अग्रदूत होते ते. दक्षिण अमेरिकेचा किनारा सोडून दुसऱ्या घराच्या शोधात अनेक वेळा त्यांनी समुद्राचा हा विशाल पट्टा ओलांडला होता. प्रत्येक वेळी ते 'गालापागोस बेटसमूहा'च्या किनाऱ्यावर उतरून येत असत. इथेच त्यांनी वस्ती केली आणि एकामागून एक जहाजावर असलेल्या त्या अद्भुत बरण्या त्यांनी इथे फोडल्या होत्या. ते स्वतः सोडल्यास त्यांच्या ह्या अद्भुत बरण्या मनुष्यजातीने कधीच पहिल्या नव्हत्या. त्यांचे हेच अवशेष आम्ही किनाऱ्यावरून उकरून काढले आणि त्यातच आम्हाला त्यांच्या सागरी सफरींचे किस्से दिसले होते. त्यावरूनच त्यांची स्थिती आणि त्यांची गोष्ट आम्ही एकत्र ओवू शकलो होतो.

आमच्या आधी कोणत्याच पुरातत्त्वशास्त्रज्ञाने ह्या बेटांचा अभ्यास केला नव्हता आणि त्यामुळे कोणालाच काही हाती लागले नव्हते. त्या अक्षत किनाऱ्यावर 'इन्का लोकां'नंतर आलेले आम्ही पहिलेच होतो. हे लोक सर्वप्रथम 'प्रशांत महासागर' ओलांडून पलीकडे गेले, असे मत मांडणारे

आम्ही पहिलेच होतो आणि हेच सिद्ध करायला आम्ही त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या पावलांवर पावले टाकीत गेलो. तिथेच पुरातत्त्वशास्त्रज्ञ रीड, स्क्योसवोल्ड आणि मी यांनी जवळपास १३० वेगवेगळ्या बरण्यांचे दोन हजारपेक्षा जास्त अवशेष शोधून काढले. गुप्तहेर बोटाच्या ठशांचा अभ्यास करतो, त्याचप्रमाणे अमेरिकेतील प्रख्यात शास्त्रज्ञांनी ह्या अवशेषांचा अभ्यास केला आणि हे सिद्ध करून दाखवले, की 'कोलंबस'च्याही हजार वर्षांआधी 'इन्का इंडियन समाजा'ने 'प्रशांत महासागरा'पलीकडे प्रवास केला आणि नवयुगाचे दरवाजे आपल्यासाठी खुले केले.[१]

सद्यकाळात अस्तित्वात असलेले प्रशांत महासागरातील बेटांवरील मनुष्याचे हे सर्वांत जुने ठसे होते. 'आईसलँड' आणि 'नॉर्वे' या दोहोंमध्ये जितके अंतर आहे, (जवळपास एक हजार मैल) साधारण तितकेच अंतर समुद्रातून पार करून दक्षिण अमेरिकेतील पूर्वीचे लोक 'प्रशांत महासागरा'तील बेटांवर वस्ती करण्याच्या उद्देशाने गेले होते. जर्मनीची 'वार्हिंकग जमात' 'आईसलँड'कडे निघाली, त्याच्याही बऱ्याच आधी तसेच 'पोलीनेशिया बेटे' वसण्याच्याही खूप आधीची ही गोष्ट आहे. त्यांनी तिथे मासेमारी केली, स्थानिक सुताची लागवड केली आणि त्यांच्या वस्त्यांपाशी मानवाच्या अस्तित्वाच्या अनेक खुणा मागे सोडीत ते एका अज्ञात मुक्कामाच्या शोधात निघाले.

'गालापागोस बेटा'पासून पुढे 'अमेझॉन नदी'पेक्षा द्रुतगतीने आणि तिच्यापेक्षा कैकपटीने रुंद असलेले हे समुद्री प्रवाह न थांबता कसलाही अडथळा न येता अनेक आठवडे गेल्यावर थेट दक्षिण महासागरीय बेटांवर नेऊन पोहोचवतात.

माझ्या समोरील नकाशावर समुद्रप्रवाहाच्या बरोबर मध्यात एक शंकास्पद ठिपका आणि त्याच्यासमोर एक प्रश्नचिन्ह असे होते. हा ठिपका म्हणजे जमीन होती का? आम्ही 'कॉन-टिकी' घेऊन त्या ठिपक्यापर्यंत गेलो, तर तिथे एक प्रचंड भोवरा आम्हाला दिसला होता. पण त्याच्या आणखी

१. अधिक माहितीसाठी थॉर हेयेरडाल आणि आर्न स्क्योसवोल्ड यांचे 'अर्किओलॉजिकल एविडन्स ऑफ प्री-स्पॅनिश विझिट टू गालापागोस आयलंड' हे अमेरिकी पुरातत्त्व विभागातर्फे १९५६ साली प्रकाशित झालेले टाचण क्रमांक १२ पाहा.

दक्षिणेला, जिथे हा प्रवाह वळसा घेऊन पुढे जातो, तिथेच आणखी एक ठिपका होता. हा ठिपका म्हणजे 'ईस्टर बेट.' मी तिथे गेलो नव्हतो; पण आता मला तिथे जायचे होते. प्रागैतिहासिक लोक ह्या ओसाड स्थळी कसे पोहोचले, हा प्रश्न मला कायम सतावत राहायचा. आता माझ्या डोक्यात त्या प्रश्नाची जागा घेतली होती ती म्हणजे, 'मी तिथे कसा पोहोचू?' ह्या प्रश्नाने

मला माझ्या स्वत:च्या अडचणी सोडवायला इतका त्रास होत होता, तर मी त्या अश्मयुगातील लोकांच्या समस्यांवर विचार करून काय उपयोग?

'कॉन-टिकी' समुद्राच्या प्रवाहासोबत उत्तरेकडे वाहत निघाली होती, तेव्हा आम्ही चंद्रप्रकाशात बसून 'ईस्टर बेटां' चे कोडे उलगडण्याचा प्रयत्न करत बसायचो. तेव्हा मी पुन्हा एकदा इथे येऊन त्या एकांड्या बेटावर उतरण्याची स्वप्ने बघायचो. आता हे स्वप्न सत्यात कसे उतरवता येईल, हा प्रयत्न मी करत होतो.

'ईस्टर बेट' चिलेच्या हद्दीत येते. तिथल्या रहिवाशांकरीता रसद घेऊन एक युद्धनौका चिलेहून येते. तिथून ही युद्धनौका माघारी चिलेच्या दिशेने परतते. ह्या दोहोंतील अंतर हे स्पेनपासून कॅनडा (४३९० मैल) इतकेच आहे. ह्याव्यतिरिक्त 'ईस्टर बेटां'चा बाहेरच्या जगाशी संपर्काचा कोणताही दुवा नाही.

ह्या युद्धनौकेने 'ईस्टर बेटां'वर जाणे, हा पर्याय माझ्यासाठी उपयोगी नव्हता. ती युद्धनौका किनाऱ्यावर असेपर्यंत एका आठवड्याभरात बेटांचे संशोधन करणे निष्फळ ठरले असते. इतका कमी कालावधी उपयोगाचा नव्हता. दुसरा पर्याय म्हणजे युद्धनौकेसोबत जायचे आणि संपूर्ण वर्ष तिथे काढायचे; पण मग एका महिन्याभरात तिथले संशोधन कार्य संपले तर? माझ्यासोबतचे शास्त्रज्ञ माझी काय हालत करतील, याचा विचारही न केलेला बरा. तिसरा पर्याय म्हणजे पुन्हा 'बाल्सा लाकडा'चे शिडाचे जहाज करून जाणे; पण आता माझ्यासोबत यायला कोणी शास्त्रज्ञ किंवा पुरातत्त्वशास्त्रज्ञ तयार होतील, असे मला वाटत नव्हते. त्यांच्याशिवाय जाऊन काय फायदा होता? एकंदरीत काय, तर मी विचार केलेला एकही पर्याय उपयोगाचा नव्हता.

माझ्याकडे असलेला एकमेव पर्याय म्हणजे खास ह्या मोहिमेसाठी एक जहाज शोधणे. पण 'ईस्टर बेटां' वर धक्का, अटकाव किंवा बंदर यांपैकी काहीच नव्हते. तिथे तेल-पाण्याचीही काही सोय नव्हती. त्यामुळे बेटांवर जाऊन परत यायला पुरेल इतकी साधनसामग्री, अन्न, पाणी, तेल आणि सर्व संशोधन साहित्य बसेल इतके मोठे जहाज असणे गरजेचे होते. त्याचसोबत तिथे बेटावर चालेल, अशी चलनशीलताही तिला हवी. एवढी मोठी यादी म्हणजे एक अवाढव्य जहाज माझ्या डोळ्यांसमोर आले, आणि इतके सगळे करून तिथे बेटांवर पाहायला किंवा संशोधनयोग्य काहीच नाही असे जर समजले तर? तर केलेली इतकी सगळी उठाठेव व्यर्थ जाणार,असे झाले, तर हे एवढे तयारीनिशी जाऊन काय उपयोग? त्याचा उपयोग व्हावा म्हणून दुसरे एखादे बेट शोधून त्यावर संशोधन करावे लागेल. तशीही 'गालापागोस' आणि दक्षिण अमेरिकेहून येणाऱ्या प्रवाहाच्या वाटेत एकाला जोडून एक अशी असंख्य सुंदरसुंदर बेटे आहेत. त्यातील एखाद्या बेटावर जाऊन काही सापडते का, हे पाहायला लागले असते,असे विचार माझ्या डोक्यात धावू लागले.

'समुद्री सफर' योजताना मी कायम 'फ्रेड ओल्सन'मध्ये असलेले माझे मित्र 'विल्हेम' आणि 'थॉमस' ह्यांचा सल्ला घेतो. एके दिवशी असेच आम्ही 'ऑस्लो'च्या धक्क्यापाशी एका जुन्या शिपिंग ऑफिसमध्ये कॉफी पीत बसलो होतो, तेव्हाची गोष्ट आहे. माझ्या ह्या मोहिमेविषयी मी अजून कोणाकडे बोललो नव्हतो. मी आत आलो तेव्हा काहीतरी गडबड आहे, हे थॉमसला समजले होते आणि त्याने आमच्यासमोर असलेल्या टेबलवर एक पृथ्वीगोल आणून ठेवला. मी तो गोलगोल फिरवित फक्त समुद्राचा निळा पट्टा दिसतो,त्या भागावर तो आणून थांबवला. हे करण्याकरता मी नकाशावरील अवाढव्य 'प्रशांत महासागर' समोर आणून एशिया, युरोप आणि अमेरिका पूर्णपणे मागच्या भागात लपवून टाकले आणि 'ईस्टर बेटां'वर बोट ठेवले.

''इथे'', मी म्हणालो, ''पण कसे जाऊ?''

दोन दिवसांनी पुन्हा आम्ही त्याच पृथ्वीगोलासमोर बसलो होतो आणि 'विल्हेम'ने त्याचे गणित माझ्या पुढ्यात मांडले.

‘‘तुझ्यासमोर असलेला सर्वांत उत्तम पर्याय म्हणजे डीझेलवर चालणारी १५० फूट लांब, ताशी १२ समुद्री मैलांचे अंतर कापणारी एक नौका घे. त्यात साधारण ५० टन पाणी आणि १३० टन तेल बसेल, इतकी जागा असली पाहिजे,’’ तो म्हणाला.

हा पर्याय सर्वांत उत्तम असेल, याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नव्हती. ‘कॉन-टिकी’ने मी प्रवास केला तेव्हा तिचे अनुगमन त्यानेच मला आखून दिले होते. त्याचा अंदाज इतका अचूक होता, की चुकून भरकटत आम्ही ‘अंगातुवा’पासून थोडे पुढे जर पोचलो नसतो, तर त्याने सांगितलेल्या दिवशीच आम्ही पोचलो असतो. ‘समुद्री सफरी’त त्याच्याइतके ज्ञान माझ्या माहितीत कोणालाच नव्हते.

काही दिवसांनी मला ‘विल्हेम’चा फोन आला. ‘स्टेवेंगह’च्या एका ‘किंनग इंडस्ट्री’तून त्याला एक प्रस्ताव आला होता. त्यांच्याकडे ‘ग्रीनलंड’मधील मच्छीमारीची एक नौका होती. सप्टेंबरपासून एक वर्षभरासाठी ती मला भाड्याने मिळेल, असे तो सांगत होता. मी पाहिले तर एप्रिल महिना संपत आला होता आणि सप्टेंबर म्हणजे फक्त चार महिने. इतक्या लवकर तयारी झाली असती काय? मला फक्त जहाज मिळणार होते, त्यासोबत साधनसामग्री किंवा खलाशी असे काहीच नव्हते. माझे स्वत:चे म्हणाल तर ‘बाल्सा नौका’ सोडल्यास नौकानयनाचा माझ्यापाशी काहीच अनुभव नव्हता. अशा प्रकारचे जहाज चालवायची कागदपत्रे आणि लायसेन्स  लागतात; कॉन-टिकी मोहिमेत माझ्यासोबत असलेल्या कोणाकडेच हे नव्हते. ‘इन्का जहाजा’वर सगळे इतके सोपे होते.

‘‘नाविकी अडचणींत आमचे ऑफिस तुला संपूर्ण मदत करेल, त्याची काळजी तू सोड,’’ थॉमस म्हणाला.

आणि काय चालू आहे, हे समजण्याच्या आतच आम्ही एका मोठ्या कॉन्फरन्स रूममध्ये बसलो होतो आणि आमच्यासमोर एक सागरी अधीक्षक, एक स्वाक्षरी अधिकारी, एक रसदी अधिकारी, विमा अधिकारी आणि असेच बरेचसे लहान-मोठे अधिकारी बसले होते. परिणामी एक प्रचंड मोठे जहाज हाती लागले. ‘स्टेवेंगह’मध्ये आडवे असलेले अवाढव्य जहाज माझ्या डोळ्यांसमोर तरंगत होते. तिच्या अधीर शिट्या माझ्या

कानात घुमत होत्या. तिच्या पोटात कोळसा किंवा उष्णता नव्हते, तिच्यावर कोणीही सवार नव्हते, रसद, पाणी, तेल, काहीच नव्हते. तिच्या पोटात लोखंडी सळ्या या, या शोकावस्थेत पसरल्या होत्या आणि अशाच ओसाड अवस्थेत ती तिथे आमची वाट पाहत उभी असल्याचे मला दिसले.

सुट्टीत शहरवासीय आपल्या कुटुंबाला खेड्यात घेऊन जाताना लागते, तशीच आत्ताही काहीशी परिस्थिती होती. पाच पुरातत्त्वज्ञ, एक डॉक्टर, एक फोटोग्राफर, अधिक एकूण तेरा जणांचा तांडा, पुर्जे भरलेले एक जहाज, विशिष्ट प्रकारची साधनसामग्री आणि सर्वांसाठी एक वर्षभर पुरेल इतके अन्न-पाणी, इतका लवाजमा घेऊन जाणे म्हणजे गंमत नाही. त्यासाठी प्रचंड नियोजन आणि पूर्वतयारी आवश्यक आहे. जेवता-जेवता 'लीझ्ट'च्या संगीतावर भर चौकात मी माझा ऑर्केस्ट्रा हाताळत आहे, असे काहीसे मला वाटू लागले. माझे मेज सर्व प्रकारचे लायसेन्स, पासपोर्ट, कागदपत्रे,फोटो आणि पत्रे इत्यादींनी भरून गेले होते. खोलीत सर्वत्र साधनसामग्रीचे नमुने, चार्ट, याद्या होते. लवकरच माझ्या खोलीतून ओसंडून वाहत हे सामान घरभर पसरले.

एकदा वर्तमानपत्रात आमच्या ह्या मोहिमेची माहिती आल्यानंतर तर गोंधळच उडाला. तऱ्हेतऱ्हेचे लोक मला पत्र लिहून नाना प्रकारच्या गोष्टी, प्रस्ताव आणि सल्ले देऊ लागले होते. जगाच्या कोनाकोपऱ्यातून आलेला एक सल्ला म्हणजे 'ईस्टर बेटां'चे खरे गुपित मला उलगडायचे असेल, तर बेटाच्या सभोवताली असलेल्या समुद्रतळाचा अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या मते, 'ईस्टर' हे इतिहासकालीन एका मोठ्या भूखंडाचा शेवटचा तुकडा होता, आणि हे बेट सोडून उर्वरित भूखंड समुद्राच्या तळाशी अजून शिल्लक होता. त्यामुळे 'ईस्टर बेटा'वर रहस्य शिल्लक नसून ते पाण्याच्या खाली होते.

एका माणसाने तर माझी ही कल्पनाच मोडीत काढली. त्यांनी लिहिलेल्या पत्रात, ही मोहीम म्हणजे पैसे आणि वेळ फुकट घालवण्याचे साधन आहे. ''तुम्ही स्वत:च्या अभ्यासिकेत बसून कांपनिक विश्लेषणातून या बेटाच्या रहस्याचा शोध लावू शकता.'' ते पुढे म्हणाले, ''मला 'ईस्टर बेटा'वरील पुतळ्याचा एक फोटो आणि अमेरिकेतील एका पुतळ्याचा फोटो


असे आणून द्या. कांपनिक विश्लेषणातून मी त्यांचे मूळ एकाच प्रजातीतून आहे किंवा नाही, हे सांगू शकेन.'' ते पुढे सांगत होते, की एकदा त्यांच्या एका विश्लेषण प्रयोगादरम्यान 'शोप्स पिरामिड'ची एक प्रतिकृती त्यांनी पुठ्ठ्यातून तयार केली आणि त्यात कच्चे मांस ठेवले. त्यांतून इतकी उग्र कंपने निर्माण झाली, की त्यांच्या समस्त कुटुंबीयांची प्रकृती बिघडली आणि सर्वांना तातडीने दवाखान्यात दाखल करावे लागले.

सप्टेंबर महिना आला. 'ग्रीनलँड'ची एक सुंदर, रेखीव पांढरीशुभ्र मच्छीमार होडी 'ओस्लो सिटी हॉल'समोरील पाण्यात उभी होती. सूर्यदेव 'कॉन-टिकी'चा दाढीवाला चेहरा तिच्या अग्रभागावर भडक लाल रंगात रंगवला होता. जहाजाच्या पुढच्या भागावर बर्फावर कोरलेली एक विचित्रशी निशाणी होती. मोहिमेबाबत माहिती असणाऱ्यांनाच ते काय आहे, हे माहिती असावे. त्यावर 'ईस्टर बेटा'वरील दोन पक्षीमानवांचे चित्र काढले होते. हे अर्धे मानव आणि अर्धे पक्षी असे असून, बेटावर सापडलेल्या एका दुर्मिळ इष्टिकेवरून हुबेहूब उतरवून काढली होती. त्याचा अर्थ हा अद्याप कोणाला माहिती नव्हता.

एक वर्षाचा कालावधी घराबाहेर काढणार, ह्या कल्पनेने घरच्यांचा आक्रोश होत असतानाही आम्हाला एक तगडा तांडा मिळाला. बायकांचे आणि प्रेयसींचे अश्रू न जुमानता रम्य अशा 'प्रशांत महासागरा'पलीकडे प्रवास करण्यास ते तयार झाले होते. आता चिमणीत धूर होता आणि बोटीबाहेरील निळ्या रेषेपर्यंत सामान गच्च भरून गेले होते. बोटीवर धावपळ चालू होती आणि किनाऱ्यावर इतकी गर्दी होती, की, शेवटच्या क्षणी सामान पोचवायला आलेल्या ट्रक्सना आणि गाड्यांना बोटीपर्यंत पोहोचणे अवघड झाले होते.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# अधर्मकांड

**उदय भेंब्रे**

अनुवाद
**अकल्पिता राऊत-देसाई**

*पोर्तुगिजांच्या धर्मांतररूपी अत्याचाराच्या भीषण वास्तवाचं चित्रण करणारी करुणार्द्र आणि ज्वलंत कादंबरी*

**४ ऑक्टोबर, १५८३**

गुरे गोठ्यात परतायची वेळ अजून झाली नव्हती; पण उन्हे निवत आली होती. गोवा बंदर आणि बंदराजवळ उभी असलेली गलबते दिसू लागली. काही

वेळाने होडी बंदराजवळ पोहोचली आणि मुख्य धक्क्याला टेकली. प्रथम भागाला परिचित असलेला शोधक उतरला, मग शिपायाने कायतानला खाली उतरण्याची खूण केली. तो खाली उतरला. त्याच्यापाठोपाठ शिपाईही उतरला. काही अंतर चालून गेल्यावर चढण लागली. तिघंही चढण चढू लागले. पुढे गोरा उमराव, मध्ये कायतान आणि त्यांच्यामागे शिपाई. लगेच व्हाईसरॉयची कमान दिसली. कमानीतून तिघंही पुढे गेले. पुढे डाव्या बाजूला दगडी कुंपण असलेला वाडा दिसला. हा किल्ला. आता तो व्हाईसरॉयचा राजवाडा आहे. जरा आणखी पुढे गेल्यावर सवाईचा लांब-रुंद चौक लागला. पोर्तुगीज त्याला 'तेरैरु दे साबाय्यु' म्हणत. कायतानने डाव्या बाजूला नजर टाकली. सॅनादाची इमारत. ही गोवा शहराची नगरपालिका. तिच्या लगतच तंबाखूच्या व्यापाराविषयीची कचेरी. पुढे थेट जाणारा रुंद असा मुख्य मार्ग. पोर्तुगीज त्याला 'रूअ दिरैत' म्हणत. चालताचालताच कायतानने उजवीकडे पाहिलं. सगळ्यात मोठी इमारत– सॅ कॅथेड्रल! तिचा विस्तार करण्याचं काम अजून चालू आहे आणि जराशी डाव्या बाजूने नजर वळवताच कायतान नकळत थांबला. त्याने उजव्या हाताने समोरील इमारतीच्या दिशेने इशारा केला आणि भयकंपित थरथरत्या आवाजात तो उद्गारला... ''मोठं घर!''

''शूऽऽ'' शिपायाने त्याच्या पाठीत बोट खुपसत म्हटलं, ''हात खाली घे आणि मुकाट्याने चाल.''

कायतानने त्वरेने हात खाली घेतला. मोठ्या घराकडे कधीच बोट दाखवायचे नाही, हे तो विसरूनच गेला होता. 'चुकलो' या अर्थाचे काकुळतीचे भाव दर्शवीत त्याने शिपायाकडे नजर टाकली. याआधी दोन-तीन वेळा तो गोव्याच्या बाजारात आला होता, तेव्हा त्याने हे घर लांबूनच पाहिले होते. त्याला कितीतरी वर्षे उलटून गेली होती. आज त्या घरासमोर पोहोचताच त्याचं मन अस्वस्थ झालं होतं. मान खाली घालूनच तो चालू लागला.

मोठं घर म्हणजे आधीची युसूफ आदिलशहाची हवेली. आफोंस दे अल्बुकर्कने गोवा शहर जिंकून घेतल्यानंतर तो या राजवाड्यात राहू

लागला होता. त्याच्यानंतर जे जे गर्व्हनर वा व्हाईसरॉय आले, ते सर्व याच राजवाड्यात राहिले. सन १५५४मध्ये दाँ प्रेद्रू मास्कारेन्यस हा व्हाइसरॉय म्हणून आला, तेव्हा तो सत्तरीच्या घरातला होता. राजवाड्याच्या उंच दगडी पायऱ्या चढायला त्याला त्रास होऊ लागला, तेव्हा बंदरालगतच्या किल्ल्यात असलेल्या हवेलीत काही बदल करून त्याने सुधारणा करून घेतल्या आणि तो तिथे राहायला गेला. तेव्हापासून गव्हर्नर वा व्हाईसरॉय त्याच हवेलीत राहू लागले आणि आदिलशहाने बांधलेली टोलेजंग हवेली मात्र रिकामीच राहिली.

शोध-चौकशी समिती (इनक्विझिशन) गोव्यात १५६०मध्ये आणली गेली तेव्हा जागेचा प्रश्न आला, तो ह्या गोवा शहरातल्या मोठ्या वास्तूने सोडवला. आतापर्यंत रिकामी असलेली ही हवेली समितीच्या ताब्यात गेली. पुढे समितीने आपल्याला हवे तसे बदल या वास्तूत करवून घेतले, तिचा विस्तार केला आणि थोड्याच कालावधीत 'इनक्विझिशन पॅलेस' म्हणून या हवेलीला नवी ओळख मिळाली. पोर्तुगीज त्या वास्तूला 'सांता काझ' म्हणजे 'पवित्र घर' म्हणत असत. स्थानिक लोक मात्र भयाने या वास्तूचा 'इन्क्विझिशन' हा उल्लेख टाळून 'मोठे घर' असे म्हणत.

या मोठ्या घराची रुंदी सत्तर हात होती. त्या घराला दोन मजले होते. घराची पुढची भिंत काळ्या पाषाणाची. मध्ये तीन दरवाजे. मधला दरवाजा जरा जास्त मोठा. तोच मुख्य दरवाजा. बाजूच्या दोन्ही दरवाज्यांचा उपयोग मोठ्या घराच्या इतर भागांत जाण्यासाठी होई. त्या भागात चॅपेल, समितीच्या कचेऱ्या आणि शोधक, अधिकारी व नोकर यांना राहण्यासाठी लहान-मोठ्या खोल्या होत्या. सगळ्या भिंती चार हात रुंदीच्या.

गोरा उमराव शिपाई आणि कायतान मुख्य द्वारापाशी पोहोचले, तेव्हा काळी पाषाणी भिंत संध्याकाळच्या उतरत्या उन्हात चमकत होती. कायतानच्या पोटात भयंकर भीतीचा गोळा उठला.

तिघेही पाषाणी उंच पायऱ्या चढून वर गेले. तिथल्या प्रचंड दालनाच्या उंबऱ्यावर कायतानची पावले क्षणमात्र थबकली. त्याच्या पायांत गोळे आले. घसाही कोरडा झाल्यासारखा झाला. परिचिताने तिकडच्या नोकराकडून

आल्काईदला निरोप पाठवला. कायतानच्या छातीतली धडधड वाढली. पुढे काय वाढून ठेवले आहे याचा विचार करताकरताच त्याची नजर त्या दालनावरून भिरभिरत होती. केवढे मोठे ते दालन... ते उंची सामान... ती तऱ्हेतऱ्हेची शोभिवंत झुंबरे... एखाद्या राजाच्या दरबारासारखेच होते ते दालन! डाव्या, उजव्या आणि पाठीमागच्या भिंतींची दारं कायतान न्याहाळत असतानाच एका दारातून आल्काईद दालनात आला. तो आणि परिचित हे दोघं पोर्तुगीज भाषेत बोलले. कायतानला काही ते समजले नाही. आल्काईदकडे कायतानला सोपवून परिचित निघून गेला. 'त्याला घेऊन ये' अशी खूण शिपायाला करून आल्काईद निघाला. त्याच्यापाठोपाठ कायतानला घेऊन शिपाई निघाला.

आतल्या एका खोलीत पोचल्यावर तिथल्या दोन फिरंगी नोकरांना आणि एका स्थानिक नोकराला आल्काईदने काही सूचना दिल्या व तो निघून गेला. दोन्ही फिरंगी नोकरांनी स्थानिक नोकराला काही सांगितलं. तो दुभाष्या म्हणूनही काम पाहत होता. आपल्याला मिळालेल्या सूचनेनुसार तो कामाला लागला. कायतानची त्याने शिपायाकडून प्रथम नखशिखान्त तपासणी करून घेतली आणि 'जे-जे काही अंगावर आहे, ते काढून मेजावर ठेव' असं कायतानला सांगितलं. कायतानच्या खिशात काही अश्रफी होत्या. गळ्यात क्रॉस असलेली सोन्याची साखळी, बोटातली अंगठी, हातात हॅट होती आणि पायांत चपला होत्या. अंगावर विजार आणि अंगरखा. कायतानने अश्रफ्या, सोन्याची साखळी आणि अंगठी काढून मेजावर ठेवली. दुभाष्याने सांगितल्याप्रमाणे फिरंगी नोकराने यादी तयार केली. त्यात सोन्याची साखळी आणि अंगठीचा उल्लेख केला नाही. घरात काय-काय आहे ते नंतर दुभाष्याने कायतानला विचारून घेतले आणि त्याच्या जमीन-जुमल्याची माहिती घेतली. गोऱ्या नोकराने त्या सगळ्यांची यादी केली.

नंतर दुभाष्याने कायतानला सांगितले, ''या सगळ्या वस्तू, घर, जमीनजुमला जप्त करण्यात आला आहे. तू गुन्हेगार नाहीस, असं सिद्ध झाल्यास तुझं सगळं तुला परत मिळेल.'' कायतान गुन्हेगार ठरला तर

ती सगळी मालमत्ता कोणाच्या मालकीची होईल, याविषयी त्या दुभाष्याने काहीच सांगितले नाही. जे काही सांगितले गेले ते कायतानने निमूटपणे ऐकून घेतले. आजपर्यंत जप्त करण्यात आलेली मालमत्ता कुणालाच परत मिळाली नाही, हे कायतानला कुठे माहीत होते?

एवढ्यात, आल्काईद परत आला. 'कायतानला घेऊन ये' अशी खूण त्याने शिपायाला केली. त्याबरोबर कायतानला घेऊन शिपाई त्याच्यापाठोपाठ निघाला. एक-दोन खोल्या पार करून ते एका मोठ्या व्हरांड्यात पोचले. व्हरांड्याबाहेर कितीतरी दुमजली घरे पसरलेली होती. दोन घरांमध्ये अंतर सोडलेले होते. घरात खाली आणि वर माडीवर छोट्या खोल्या तयार केलेल्या होत्या. प्रत्येक घरात आठ अशा सुमारे २४० खोल्या तिथे होत्या. आल्काईदने कायतानला वरच्या एका खोलीजवळ नेऊन उभे केले आणि शिपायाला सूचना देऊन तो निघून गेला. हा सगळा परिसर तुरुंगाचा आहे, हे कायतानच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. आल्काईद म्हणजे तुरुंगाधिकारी आहे, हेपण त्याला कळून चुकले आणि त्याची मुद्रा भकास झाली. कोणाशीतरी बोलावे असे त्याला आसासून वाटले; पण सकाळपासून समवेत असलेला शिपाई कधीच निघून गेला होता.

त्या खोलीबाहेरच्या व्हरांड्यात कायतान उभा होता. तिथेच शिपाई पहारा देत थांबला होता. त्याच्याशी काही बोलण्याचा कायतानने प्रयत्न केला; पण शिपायाने काही प्रतिसाद दिला नाही. शिपायांना कैद्यांशी बोलण्यास बंदी होती. त्याने मुकाट्याने कैद्याचा पोशाख कायतानपुढे धरला आणि 'कपडे बदल' असे सुचवले. इतक्यात एक न्हावी तिथे आला. त्याने कायतानला बसायला सांगितले. कायतान उकिडवा बसला. न्हाव्याने कायतानची शेंडी कापून टाकली आणि त्याचे पूर्णपणे मुंडण केले. स्त्री अथवा पुरुष कैद्याला चौकशी समितीचा नियम पाळावाच लागत होता. न्हावी जाताच शिपायाने खोलीचे दार उघडले आणि कायतानला आत जाण्याचा इशारा केला. कायतान आत जाताच पाठीमागून खोलीचे दार बंद करण्यात आले.

तिन्हीसांजा व्हायला आल्या होत्या. कायतानच्या खोलीत दिवा नव्हताच. सगळी खोली अंधारी. नाही म्हणायला एका भिंतीवर बऱ्याच उंचीवर एक झरोका होता, त्याला लोखंडी गज लावलेले होते. त्यातून येणाऱ्या मंद उजेडात कायतानने खोलीचा अदमास घेतला. आठ हात लांबी आणि रुंदीची ती खोली होती. तिथे पाण्याने भरलेला एक मातीचा घडा आणि पिण्यासाठी पाणी ठेवण्याचे मातीचेच आणखी एक भांडे होते. एका कोपऱ्यात उंचवट्यावर चटईची गुंडाळी ठेवलेली होती. कोपऱ्यात एक केरसुणी आणि नैसर्गिक विधीसाठी झाकण लावलेले पसरट भांडे तिथेच ठेवलेले होते.

उजेडाची शेवटची तिरीप विरून गेली आणि खोलीभर अंधार पसरला. कायतान भिंतीला पाठ टेकून उदास बसून होता. सकाळी घरून पेज पिऊन तो निघालेला. दुपारी होडीत त्याला दोन पाव खायला दिले होते. त्यातला त्याने एकच खाल्ला होता. आता त्याला भुकेची जाणीव झाली. काहीतरी खायला देतील, अशी आशा तो बाळगून होता; पण तुरुंगातले संध्याकाळचे जेवण चार वाजता देण्यात येते, हे त्याला दुसऱ्या दिवशी कळणार होते. त्याने दोन्ही पाय पोटाजवळ ओढून घेतले, दोन्ही हातांनी गुडघे कवटाळले आणि त्यावर मस्तक टेकवले. सकाळी सुरू झालेल्या अपशकुनांचा पट त्याच्या बंद डोळ्यांसमोरून वेगाने सरसर जाऊ लागला.

सकाळ नेहमीप्रमाणेच उगवली; पण कायतानने आपली कामे जरा घाईतच उरकली. नारळाच्या बागेत आळे करण्याचे काम चालू होते. शेतकापणीचे कामपण जवळ आले होते. त्याचीही तयारी करायची होती. पिएदादने– त्याच्या बायकोने त्याला पेज वाढली. ती पिऊन त्याने अर्धी विजार, बंडी अंगावर चढवली. डोक्याला पंचा गुंडाळला. एवढ्यात अंगणातून आलेला आवाज त्याच्या कानांवर पडला.

''ओऽऽ घरा–''

पडवीचे दार उघडेच होते. दारात जाऊन पाहतो, तर अंगणात घोड्यावरून आलेला एक फिरंगी त्याला दिसला. त्याच्या छातीवरचा सोन्याचा बिल्ला चमकत होता. घोड्यापासून जरा अंतरावर एक शिपाई

त्याला दिसला. तो गोवा शहरातला हे जाणून त्याला ''कोण पाहिजे?'' असे कायतानने विचारले.

''कायतान व्हाज तू?'' – शिपाई.

''होय. काय झाले?''

घोड्यावर बसलेल्या फिरंग्याने पोर्तुगीज भाषेत शिपायाला काहीतरी सांगितले. मग शिपाई म्हणाला,

''तुला गोवा शहरात यावे लागेल.''

''कशाला?''

''ते तिकडे गेल्यावरच कळेल तुला.''

''कधी यायचे आहे?''

''आत्ता आमच्याबरोबरच.''

''आत्ता?''

''होय. चल लवकर.''

अकस्मात आलेल्या या आमंत्रणवजा आदेशाने कायतान आश्चर्यचकित झाला आणि भांबावलाही. कसलेतरी अनामिक भय त्याच्या मनाला स्पर्शून गेले; पण त्याने ते झटकले. असेल कसलेतरी सरकारी काम... कदाचित सरकारला करभरणी वाढवायची असेल. ''येतो'' म्हणत तो आत गेला. पिएदाद स्वयंपाकघरात मासे साफ करत बसली होती. कायतानने उसना आव आणून तिला सांगितले, ''सरकारी बोलावणे आले आहे. जरा गोवा शहरात जाऊन येतो.''

हे ऐकून पिएदाद एकदम धसकली. हातातली सुरी पट्कन खाली टाकून ती पुढे आली. ''असे अकस्मात बोलावणे? कशासाठी? आणि जाणार कसे तुम्ही?'' पिएदादच्या आवाजात भय काठोकाठ भरून राहिले होते.

कायतानने परत उसना आव आणून म्हटले, ''ते न्यायला आले आहेत मला. तू चिंता नको करूस. कसली अडचण आली, गरज भासली तर मतेसला नाहीतर ज्याकीनला बोलाव.'' मतेस तिथे जवळच खोपटीत राहत होता. ज्याकीन त्याची बायको. दोघंही शेतजमिनीत आणि बागेत

राबत. घरातली कामे करण्यासाठी शेवंती मोलकरीण होतीच.

कायतानने अंगावर नवे कपडे चढवले. डोक्यावर हॅट चढवली. पायांत चपला घातल्या आणि अंगणात उतरून त्याने म्हटले,

''चला.''

घोड्यावर पुढे फिरंगी स्वार, मध्ये कायतान आणि पाठीमागे शिपाई– असे ते तिघेही रायतूरच्या दिशेने चालू लागले. पडवीवर दाराच्या आडून पिएदाद ते दिसेनासे होईपर्यंत त्यांना चिंतित मनाने पाहत होती.

घोड्यावरचा तो फिरंगी म्हणजे शोधक-उमराव. उमरावांमधल्या काही जणांना चौकशी समितीसाठी शोधक म्हणून नेमले होते. कोणालाही पकडून आणायचे असेल, तेव्हा ते काम शोधकाकडे सोपवले जाई. हे मोठे मानाचे काम, असे त्याला वाटे. त्याच्या छातीवर लटकणारा सोन्याचा बिल्ला समितीनेच त्याला दिला होता. बिल्ल्यावर समितीचे मानचिन्ह असणारे चित्र कोरलेले होते. चौकशी समितीने कायतानला आरोपी मानले होते आणि आता हा शोधक त्याला मोठ्या घरात घेऊन जात होता. मात्र, कायतानला हे काहीच माहीत नव्हते.

शेतातून जाणारी वाट पार करून ते रायतूरच्या किल्ल्याजवळ पोचले. किल्ल्यासाठी बांधलेल्या लहानशा धक्क्याला टेकून तिथे जवळच एक होडी तयार होती. काठावर एक गोरा सैनिक उभा होता. शोधक-उमराव घोड्यावरून उतरला. त्याने सैनिकाकडे घोडा सोपवला आणि तो होडीत जाऊन बसला. शिपायाने कायतानला होडीत बसण्याची खूण केली. कायतानने तसे करताच शिपाईही त्याच्यामागोमाग होडीत चढला. रायतूरच्या नदीतून उत्तर दिशेने होडी जाऊ लागली. आपल्याला नेण्यासाठी कालच सकाळी येऊन शोधक-उमराव आणि शिपाई किल्ल्यात येऊन राहिले असावेत, असा अंदाज कायतानने केला. होडी लहानशीच; पण वल्हवणारे खूप जण असल्यामुळे होडीने लगेच वेग घेतला. दुपार माथ्यावर आली तशी उन्हे कमालीची तापली. सूर्य अगदी डोक्यावर आला तेव्हा होडी रायतूरच्या नदीतून बोरी, केळशी ओलांडून झुआरी नदीत पोचली. तिथे ती उजव्या बाजूने फिरली आणि झुआरीच्या उत्तर दिशेकडून आक्रमू लागली. आता

होडीची गती जरा मंद झाली, तरी गोवा शहरात लवकरात लवकर पोचायला हवे, हे नावाड्यांना चांगलेच ठाऊक होते. त्यांच्या अदमासाप्रमाणे होडी मडकई, भाणस्तारी ओलांडून कुंभारजुवेच्या दिशेने पुढे गेली आणि तिथल्या बेटाच्या डाव्या बाजूला वळली, मग मांडवी नदीतल्या गोवा बंदराच्या त्या लहानशा धक्क्याला टेकली.

फिरंगी, कायतान आणि शिपाई रायतूरच्या किल्ल्याच्या दिशेने निघाले आहेत, हे काही गावकऱ्यांनी पाहिले होते. एका-दोघांनी धावत येऊन मतेसला त्याबाबत विचारलेही; पण त्याला बापड्याला काहीच माहीत नव्हते. त्याने ही गोष्ट ज्याकीनला सांगितली मात्र– ती हातातले काम तिथेच सोडून लगबगीने धन्याच्या घरी आली. भिंतीला पाठ टेकवून उदास बसलेल्या पिएदादला पडवीबाहेरूनच तिने विचारले, ''मालकीण, काय झाले? धनी कोठे गेलेत?'' पिएदाद काहीच बोलली नाही. ज्याकीन तिच्याजवळ गेली आणि परत तोच प्रश्न तिने विचारला; पण पिएदादची नजर शून्यात लागली होती. ज्याकीनला तिच्या अशा वागण्याची सवय होऊन गेली होती. गेल्या दोन वर्षांपासून पिएदाद मध्येच अशी विचित्र वागायची. कधी गप्प, तर कधी अर्थहीन बडबड करायची. ज्याकीन अगदी काकुळतीला येऊन विचारू लागली, तेव्हा पिएदादने तोंड उघडले.

''ते घेऊन गेले धन्याला, गोवा शहरात...''

''गोवा शहरात? का?''

पिएदादने उत्तर न देता, 'माहीत नाही' अशा अर्थाने फक्त मान हलवली.

''कधी येणार?''

पिएदाद गप्पच. ज्याकीनने विचार केला– आणखी प्रश्न विचारून उपयोग नाही. सकाळी गोवा शहरात गेलेला माणूस संध्याकाळपर्यंत रायला कसा पोचेल?

तिने म्हटले,''मालकीण, तुम्ही काही घाबरू नका. धनी कदाचित उद्या पोचतील. मी रात्री येते तुमच्या सोबतीला.''

पिएदाद परत शून्य-भकास नजरेने तिच्याकडे पाहत राहिली.

ज्याकीनने लगबगीने जाऊन ही गोष्ट मतेसला सांगितली.

''काऽऽय? गोवा शहरात?'' तो जोरात ओरडला. त्याच्या आवाजात आश्चर्य, चिंता, भय पुरेपूर भरून राहिले होते. हातातले खोरे त्याने तिथेच टाकले. कमरेला पंचा गुंडाळत तो निघाला. जाता-जाता त्याने ज्याकीनला सांगितले,

''मी गोपू शेटीला कळवून येतो हां!''

गोपू शेजारी जवळच राहत होता. तो कायतानचा बालमित्र. दोघंही सुख-दु:ख वाटून घेत. मतेसने गोपू शेटीला घडलेला प्रकार सांगितला. गोपू अगदी गोंधळून गेला. या प्रकाराचा अर्थ काय लावायचा, हेच त्याला समजेनासे झाले. दुसऱ्याच क्षणी त्याला पिएदादची आठवण झाली. ती हल्ली अधेमधे भ्रमिष्टासारखी वागते, हे त्याला माहीत होते. त्याने विचारले,

''पिएदाद एकटीच आहे घरी?''

''होय, एकटीच; पण त्याबाबत चिंता नको. ज्याकीन तिला एकटे सोडणार नाही. आणि मीपण आहे ना!''


''पिएदादच्या माहेरी दियोगला कळवले पाहिजे.''

''होय, मीपण तोच विचार करत होतो.'' गोपूने मुलाला हाक मारली. मतेसने आणलेली बातमी मुलाला सांगितली आणि रासईला जाऊन पिएदादच्या भावाला हे कळवून ये, म्हणून सांगितले. मुलगा लगोलग निघाला. गोपू शेटी घरात गेला. बायकोला थोडक्यात हे सगळे कळवून तो बाहेर आला आणि त्याने म्हटले,

''चल मतेस, पिएदादला भेटून येऊ.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# पडछाया

**भाग्यश्री नूलकर**

*अज्ञान-अंधश्रद्धेचं फोफावलय वादळ*
*विज्ञानकथांतून करू या प्रबोधन*

रात्रीचे बारा वाजले तरी नेहाला झोप येत नव्हती. आज ती आनंदाच्या अत्युच्च शिखरावर होती. मिस इंडियाचा मान घेऊन घरी आली होती. सौंदर्यसम्राज्ञी हा केवढा मोठा बहुमान! आज स्वत:वर ती खूप खूश होती. सतत आरशासमोर उभी राहून आपले सौंदर्य

निरखत होती. प्रेझेंट मिळालेल्या बुकेतील फुलांच्या सुंगधाने तिची रूम भरून गेली होती. मिसेस सोनावालांनी नेहाचे नाव 'मिस इंडिया-२०२५' बहुमानासाठी जाहीर करताच तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. माजी 'मिस इंडिया मिस मेरी' हिने तिच्या डोक्यावर मुकुट ठेवताना हजारो कॅमेऱ्यांचे फ्लॅश खटाखट चमकले. मग मम्मीने येऊन तिला जोरदार मिठी मारली. दोघी मायलेकींचे डोळे आनंदाश्रूंनी भरून गेले. उद्याच्या सर्व वर्तमानपत्रांत पहिल्या पानावर तिचा फोटो झळकणार या विचारांनीच तिला झोप येत नव्हती. शेवटी ती मम्मीच्या रूममध्ये जाऊन तिच्या कुशीत विसावली.

सकाळी डॉक्टर ऑन्टीचा फोन दाईमाँने उचलला तेव्हाच नेहाला जाग आली. मम्मी सकाळी उठून कधी कॉलेजमध्ये गेली हे तिला कळलंच नव्हतं. दाईमाँ, ''नेहा बेटी अजून उठली नाही, कालच्या समारंभामुळे दमली आहे,'' असे डॉक्टर आन्टीला सांगणार; तोच नेहा पट्कन उठली. ''हॅलो ऑन्टी'' ''हाय ब्यूटीक्वीन!'' असा नेहमीचा प्रेमळ आवाज ऐकू आला. ''अभिनंदन! त्रिवार अभिनंदन! आमच्या लाडक्या मनीमाऊचे अभिनंदन!''

''मी रागवलेय तुझ्यावर!'' नेहा म्हणाली. ''का बुवा?'' ऑन्टी म्हणाली. ''आली नाहीस ती कालच्या फंक्शनला?'' नेहा ''ओ माऊ, कुठून बोलतेय माहीत आहे का तुला?'' ''नाही'' ''अगं मी कोलकात्याहून बोलतेय एका मोठ्या केसमध्ये अडकलेय. उद्या परत येणार आहे. मग भेटू. खूप खूप बोलायचंय, आमच्या माऊचे कौतुक करायचेय! चल अच्छा उद्या भेटू!'' पलीकडून आवाज आला. नेहाने फोन ठेवला.

डॉक्टर ऑन्टी म्हणजे मम्मीची अगदी खास मैत्रीण मिस नीना, जगप्रसिद्ध जीवशास्त्र संशोधिका. लहानपणापासून नेहा तिला बघत होती. नेहा म्हणजे डॉक्टर ऑन्टीची लाडकी भाची. डॉक्टर आंटीला नेहाच्या निळ्या डोळ्यांचे भयंकर कौतुक होते. म्हणून ती नेहाला नेहमी मनीमाऊ म्हणायची. नेहाला पण स्वत:च्या निळ्या डोळ्यांचे आकर्षण. निळे डोळे म्हणजे जणूकाही तिचे अस्तित्वच! लहानपणापासून सर्व जण निळ्या

डोळ्यांची गोड मुलगी म्हणून तिच्याकडे बघत राहायचे व तिचे कौतुक करायचे. आज, आज तिला कदाचित निळ्या डोळ्यांमुळेच हा बहुमान मिळाला,असे तिला राहून राहून वाटत होते.

आज ती मुद्दामच घरी राहिली होती.सर्व कंपन्यांनी मिस इंडियासाठी पुरस्कृत केलेल्या हॉटेलमध्ये राहण्यापेक्षा स्वतःच्या घरी राहून आनंद उपभोगायचा होता. दोन दिवसांनी लगेचच सिंगापूरला जावयाचे होते. एका भारतीय माणसाने तेथे नव्याने चालू करत असलेल्या कॉस्मेटिक प्रॉडक्ट्सचे उद्घाटन करण्यात मुख्य पाहुणी म्हणून 'मिस इंडिया' हा बहुमान मिळणाऱ्या स्त्रीसाठी विमानाची अगोदरच तिकिटे पाठवली होती. त्या समारंभाची आमंत्रण पत्रिका नेहाने उचलली व वाचू लागली. कंपनी प्रमुखाचे नाव- श्री. अरुण प्रधान वाचून तिला जरा आश्चर्यच वाटले. डॅडीच्या नावाशी हे मिळतेजुळते असणे हा एक योगायोगच असावा, असे तिला वाटले.

लहानपणापासून ती, मम्मी, दाईमाँ अशा तिघीजणीच होत्या. शाळेतील इतर मुलींचे डॅडी बघून ती नेहमी मम्मी व दाईमाँला डॅडींविषयी विचारत असे. दोघीही तो विषय नेहमी टाळत. तुझे डॅडी हयात नाहीत, असे सांगून विषय टाळत. मम्मी कॉलेजमध्ये अर्थशास्त्राची प्रोफेसर. मम्मीचे नेहावर निरतिशय प्रेम, प्रत्येक गोष्ट तोंडातून बाहेर पडायच्या आत घरात हजर होई. तिला कधीही डॅडीच्या प्रेमाची उणीव भासली नाही; परंतु कधी कधी मम्मीचे वागणे मात्र चमत्कारिक वाटे. नेहाचाच फोटो छातीशी घेऊन मम्मी रडत बसे. नेहाला नेहमी वाटे मी जिवंत असताना मम्मी माझा फोटो घेऊन का रडत बसते? कदाचित तिला डॅडीची आठवण येत असेल अशी ती मनाची समजूत करून घेई.

तेवढ्यात फोन खणखणला. नेहा विचाराच्या तंद्रीतून दचकली. तिच्या जिवलग मैत्रिणीचा अभिनंदनाचा फोन आला होता. दाईमाँ नेहा सिंगापूरला जाणार हे कळताच त्या तयारीला लागली होती. पहाटे चारचे फ्लाइट होते. कंपनीचे रिप्रेझेंटेटिव्ह तिला घ्यावयास येणार होते.

दाईमाँनी निघताना एक काजळाची तीट तिला दृष्ट लागू नये म्हणून

तिच्या कपाळाच्या कडेला लावली. नेहाला खुद्कन हसू आले. मम्मीने कपाळाचा गोड पापा घेतला. नेहा झरझर पायऱ्या चढून कधी वर गेली ते मम्मीला कळलेच नाही.

सिंगापूरला पोहचताच कंपनीची मोठी टीम हार-बुके घेऊन स्वागताला उपस्थित आहे, हे नेहाला दुरूनच दिसले. तिची एका शानदार हॉटेलात राहण्याची सोय करण्यात आली होती. जरासा वॉश घेऊन समारंभाच्या ठिकाणी जाण्यास ती तयार झाली. कंपनीने अतिशय सुंदर बडदास्त ठेवली असल्यामुळे तिची कंपनीचे प्रमुख श्री. प्रधान यांना पाहण्याची उत्सुकता वाढली होती. एका आलिशान कारमधून तिला एका प्रशस्त अद्ययावत हॉलमध्ये पोहचवण्यात आले. हॉलमध्ये शिरताच टाळ्यांच्या कडकडाटाने तिचे स्वागत झाले. दुरूनच तिला घ्यावयास कंपनीप्रमुख श्री. प्रधान व साधारण तिच्या वयाचीच मुलगी येताना दिसली. त्या मुलीची चालण्याची ढब आपल्यासारखीच आहे, असे नेहाला वाटले. ते दोघेही जवळ आले. ''हॅलो, मिस इंडिया'' अशी प्रधानांनी हाक मारली व हस्तांदोलन करण्यास पुढे आले. तिला त्यांचे हास्य खूप आपुलकीचे वाटले. वळून तिने त्या तरुणीकडे पाहिले तर तिचे निळे डोळे लकाकून चमकले. क्षणभर नेहा चमकली. आपण आरशात तर पाहत आहोत का अशी शंका मनात आली. नेहा भयंकर अस्वस्थ झाली. निळे डोळे, माझे अस्तित्व, तेच कुणीतरी हिरावून घेतेय, असे तिला क्षणभर वाटून गेले. त्या दोघांची याबाबत काहीच आश्चर्यचकित प्रतिक्रिया नव्हती. त्यामुळे नेहा अधिकच अस्वस्थ झाली. तिने तो उद्घाटन समारंभ कसाबसा उरकला व प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे सर्व पुढील कार्यक्रम रद्द करून, पहिल्या विमानाने मुंबईला परत जाण्याची इच्छा प्रदर्शित केली, आणि त्याप्रमाणे तिची सोयही करण्यात आली. मम्मीला काळजी वाटू नये म्हणून लवकर परत येण्याचा फोन तिने केला नाही.

घरी पोहचली तेव्हा मम्मीची कॉलेजला जाण्याची गडबड होती. बेल वाजताच मम्मीने दार उघडले. नेहाला पाहून मम्मीला आश्चर्य वाटले. ''नेहा, नेहाबेटी तू परत कशी आलीस? चार दिवसांचा कार्यक्रम होता

ना?'' नेहाच्या डोळ्यांतून झरझर अश्रू वाहू लागले. ''मम्मी तू मला फसवलंस,'' नेहा म्हणाली. ''काय झालं?'' मम्मी, ''अरुण प्रधान माझे कोण लागतात? डॅडी आहेत ना माझे? तू, दाईमाँ, डॉक्टर ऑन्टी सर्वांनी मला फसवलंय, हो ना?'' मम्मीला आता सर्व सांगण्यावाचून गत्यंतरच राहिले नाही.

''होय, अरुण प्रधान तुझे वडील आहेत. तू एक-दोन महिन्यांची असताना काही कारणास्तव आमच्या दोघांचे पटेनासे झाले. तुझे वडील रसायनशास्त्राचे प्रोफेसर, परंतु त्यांना पैसा कमावण्यासाठी परदेशात व्यवसाय सुरू करावयाचा होता. मला या गोष्टी पसंत नव्हत्या. म्हणून आम्ही वेगळं व्हावयाचं ठरवलं. तू लहान होतीस त्यामुळे अशा गोष्टी मी तुला सांगू शकले नाही.'' नेहाला आणखीनच रडू फुटले. ''मम्मी, तू माझ्यापासून हे सर्व लपवायला नको होते. अन् डॅडीबरोबर ती निळ्या डोळ्यांची मुलगी माझी जुळी बहीण आहे ना?''

''अं? हो. चल बेटी मला कॉलेजला जायला उशीर होतो,'' असे म्हणून मम्मी उठली व निघून गेली.

नेहा शून्यात बघत बसून राहिली. ते निळे डोळे मात्र तिची पाठ सोडत नव्हते. मम्मीने डॅडीविषयी सांगितले नव्हते या गोष्टीमुळे नेहा आता अस्वस्थ नव्हती; परंतु जुळी बहीण म्हणताच मम्मीने विषय टाळला, हे तिच्या नजरेतून सुटले नव्हते.

तिला एकदम मम्मीच्या डायरीची आठवण झाली. लहानपणी एकदा दोनदा डायरी खेळायला घेतली असताना मम्मी भयंकर चिडल्याची देखील तिला आठवण झाली. ती धावतच मम्मीच्या बेडरूममध्ये गेली. सर्वांत खालच्या खणात ती डायरी सापडली. तिने पान काढले.

८ सप्टेंबर २००६ म्हणजे बरोबर १९ वर्षांपूर्वीचे ते पान होते.

८ सप्टेंबर २००६

'अरुणच्या व माझ्या रोजच्या वादाला मी कंटाळले आहे. परंतु रियाशिवाय मी राहू शकत नाही व रियाशिवाय अरुणही राहू शकत नाही, हे मला माहीत आहे. आयुष्यात कधी अशा प्रसंगाला तोंड द्यावे लागेल, असे

कधी वाटलेच नव्हते. रिया, माझी सोनुली काय करू गं मी?'

९ डिसेंबर २००७

'नीताने, माझ्या जिवलग मैत्रिणीने, या यमयातनांतून सुटका केली. नेहाचा चमत्कारिक जन्म माझ्यासाठी वरदान आहे. अरुण रियाला घेऊन उद्या सिंगापूरला रवाना होईल आता दुधाची तहान ताकावर का होईना मी भागवू शकते.' नेहाने डायरी बंद केली. तोच त्यातून एक वर्तमानपत्रातील कात्रण खाली पडले. ते तिने उघडून पाहिले. त्यात ठळक बातमी होती.

'मिस नीता, प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ यांनी जनुकीय तंत्रज्ञानातला, महत्त्वपूर्ण टप्पा गाठला.' 'एका क्लोनिंग बालिकेचा जन्म.'

मुंबई १ डिसेंबर २००७

जनुकीय तंत्रज्ञानातले आतापर्यंतचे महत्त्वपूर्ण टप्पे. १९९३ जॉर्ज वॉशिंग्टन विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी माणसाच्या गर्भाच्या सुरुवातीच्या पेशी कृत्रिमरीत्या क्लोन करून बनवल्या व त्या प्रयोगशाळेच्या चंबूत बरेच दिवस जिवंत ठेवून दाखविल्या.

१९९७ : स्कॉटलंडच्या रोसलीन संशोधन केंद्रातील संशोधक इआन विल्मुट यांनी प्रयोगशाळेत मेंढीची क्लोन बनवली जिचे नाव 'डॉली' होते. डॉली बनवताना तिच्या आईच्या त्वचेची पेशी वापरण्यात आली.

१९९८ : हवाई विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी क्लोन करून बारा उंदीर बनवले व त्यांच्या तीन पिढ्या निर्माण केल्या.


१९९८ : जपानच्या वैज्ञानिकांनी एका गाईच्या पेशीमधून गाईच्या आठ पेशी बनवल्या. ज्यापासून एकमेकांसारख्या आठ गाई बनवता येणे शक्य असल्याचे सिद्ध झाले.

आता २००७ सालातील महत्त्वपूर्ण टप्पा :

२००७ : 'मिस नीता यांच्या अथक प्रयत्नांतून एका क्लोन मानवी बालिकेचा जन्म.'

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# कोरोनानंतरचे उद्योगविश्व

**डॉ. गिरीश वालावलकर**

*अनेकविध उद्योगवाटांचा माग काढत नव्या संधीची वाट दाखवणारं मार्गदर्शक पुस्तक*

### उद्योजकाची उर्जा

एखादी संकल्पना घेऊन त्यावर एक संपूर्ण उद्योग उभा करणाऱ्या व्यक्तीला उद्योजक मानलं जातं! अशा प्रकारे एक संपूर्ण नवा उद्योग निर्माण करण्यामध्ये जोखीम असते, पण त्याचबरोबर तो उद्योग यशस्वी

झाल्यावर त्यातून मिळणारे फायदेसुद्धा तितकेच आकर्षक असतात. त्या फायद्यांचा विचार करून आवश्यक ती जोखीम घेण्याचा आत्मविश्वास आणि निग्रह उद्योजकाकडे असतो. उद्योजक अनेक नावीन्यपूर्ण संकल्पना, उत्पादने, सेवा आणि कार्यशैली यांच्या आधारावर शून्यातून एक यशस्वी उद्योग उभा करतो.

उद्योजक आणि कॉर्पोरेट जगातला व्यावसायिक अधिकारी यांच्यामध्ये काही मूलभूत फरक असतात. व्यावसायिक अधिकाऱ्यांकडे उद्योगाशी संबंधित मार्वेâटिंग, फायनान्स, रिसर्च किंवा अकाउंट्स यांसारख्या एखाद्या अंगाचं सखोल ज्ञान असतं. बहुतेक व्यावसायिक अधिकाऱ्यांकडे त्यांच्या क्षेत्रातली एखादी उच्च शैक्षणिक पदवी असते. अनुभव, नियमित वाचन, आपल्या क्षेत्रातल्या इतर अधिकाऱ्यांशी चर्चा आणि विचारविनिमय यांचा वापर करून व्यावसायिक अधिकारी आपलं ज्ञान अद्ययावत ठेवत असतात. त्या ज्ञानाच्या आधारावर कंपनीनं नेमून दिलेलं त्यांच्या क्षेत्रातलं काम ते उत्तम रीतीने पार पाडत असतात. त्यांच्या क्षेत्रापलीकडे कंपनीच्याच इतर अंगांविषयी त्यांना फारशी माहिती असतेच असं नाही. ती असावी, अशी कंपनीची त्यांच्याकडून अपेक्षासुद्धा नसते. त्यांच्या प्रगतीचा मार्ग ठरलेला असतो. आपलं काम उत्तम रीतीनं केल्यास त्यांची ठरावीक काळात, ठरावीक गतीनं, एका मर्यादेपर्यंत प्रगती होत जाणार हे जवळपास निश्चित असतं.

याउलट उद्योजकाचा मार्ग अनिश्चितता आणि असुरक्षितता यातून जातो. उद्योजकाकडे एखाद्या क्षेत्रातल्या औपचारिक पदवीपेक्षा योग्य संधी ओळखण्याची दृष्टी आणि त्या संधीतून व्यवसाय उभा करण्याची क्षमता आणि ऊर्जा असणं गरजेचं असतं. त्यांच्या जोडीला न डळमळणारा आत्मविश्वास आणि प्रचंड कष्ट घेण्याची तयारी असेल, तर उद्योजकाच्या प्रगतीला मर्यादा नसतात.

‘ओसाका इलेक्ट्रिक लाईट’ या जपानी कंपनीत काम करणाऱ्या मात्सुशीता नावाच्या एका साध्या कामगारानं बल्ब लावण्यासाठी एक नव्या प्रकारचं सॉकेट बनवलं. कंपनीतल्या त्याच्या वरच्या अधिकाऱ्याला ते सॉकेट

फारसं आवडलं नाही. पण मात्सुशीताचा आपण बनवलेल्या सॉकेटवर पूर्ण विश्वास होता. त्यानं नोकरी सोडली. स्वत:च एक अत्यंत लहान कंपनी सुरू केली. एका तळघरात तो आपली सॉकेट्स बनवून विकू लागला. त्याला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. मात्सुशीतानं तळघरात सुरू केलेल्या त्या कंपनीला आज आपण 'पॅनासॉनिक' या नावानं ओळखतो. एल.सी.डी. टीव्ही, व्हिडिओ गेम्स, संगणक यांसारखी अद्ययावत उत्पादने बनवणारी ती एक प्रचंड मोठी बहुराष्ट्रीय कंपनी आहे. २०२२मध्ये या कंपनीची वार्षिक उलाढाल ५ लाख साठ हजार कोटी रुपये होती!

उद्योजकानं स्वत:चा उद्योग सुरू केल्यानंतरचा सुरुवातीचा काही काळ त्याची परीक्षा पाहणारा असतो. उद्योजक हा स्वत: सुरू केलेल्या उद्योगाचा संस्थापक आणि मालक असला, तरीही सुरुवातीला कच्च्या मालाची खरेदी, मालाचं उत्पादन, पत्रव्यवहार, हिशोब, विक्री ही सर्वच कामं त्याला स्वत:च्या देखरेखीखाली किंवा बऱ्याच वेळा स्वत:च करावी लागतात, कारण त्यासाठी आवश्यक ते कर्मचारी ठेवण्याइतकं आर्थिक पाठबळ नसतं आणि या सर्व कामांचं योग्य ज्ञान फक्त त्यालाच असतं. परंतु सुरुवातीला केलेल्या या कामांचे भविष्यात त्याला अनेक फायदे होणार असतात. प्रत्येक कामातल्या लहानमोठ्या खाचाखोचा त्याला कळतात. आपल्या कच्चा माल पुरवठादारांशी, वितरकांशी आणि ग्राहकांशी थेट बोलल्यामुळे त्यांच्याबरोबर एक प्रकारचं व्यावसायिक नातं निर्माण होतं. या नात्याचा त्याला तुलनेनं सवलतीच्या दरात कच्चा माल मिळणं किंवा बाजारातल्या स्पर्धकांबद्दल आणि त्याच्या क्षेत्रात घडत असलेल्या घडामोडींबद्दल माहिती मिळणं यासाठी उपयोग होत राहतो. उद्योग उभारण्यासाठी आणि नंतर तो चालवण्यासाठी उद्योजक एक व्यवस्था निर्माण करतो. उद्योग उभारण्याच्या या संघर्षाच्या काळात घेतलेल्या कष्टांमुळे त्या व्यवस्थेचं, तिच्या सगळ्या बारकाव्यांसह सर्वांगीण ज्ञान उद्योजकाला मिळतं. त्यातून त्याची त्या व्यवस्थेवर आणि पर्यायानं उद्योगावर दीर्घकालीन पकड निर्माण होते.

उद्योगाचा हा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पडल्यावर दुसऱ्या टप्प्यामध्ये उद्योजकासमोर वेगळ्या प्रकारची आव्हानं उभी राहतात. आत्ता उद्योग

बऱ्यापैकी चालू लागलेला असतो. पैशाची थोडी का होईना, पण आवक सुरू झालेली असते. अशा वेळी उद्योजकाला काही  लोकांना नोकरीवर ठेवणं आवश्यक वाटू लागतं. स्वत:ची काही कामं या नव्या लोकांवर सोपवून उद्योजकानं अधिक मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारणं गरजेचं असतं. अशा वेळी आपल्या एखाद्या परिचिताला किंवा मित्राला किंवा नातेवाइकाला नोकरी देऊन त्याच्यावर काही कामं सोपवण्याकडे उद्योजकांचा कल असतो. त्यांच्याबरोबर आधीपासून संवाद असल्यामुळे त्यांच्याकडून काम करून घेणं सोपं जाईल, असा उद्योजकाचा अंदाज असतो. परंतु व्यक्तिगत संबंध ठेवण्यासाठी चांगल्या असलेल्या माणसाकडे अपेक्षित व्यावसायिक काम करायची क्षमता असतेच असं नाही. जर तो अपेक्षित काम योग्य प्रकारे करू शकला नाही, तरी त्याच्याबरोबर असलेल्या वैयक्तिक संबंधांमुळे त्याला नोकरीवरून काढणेसुद्धा अवघड ठरते. म्हणून उद्योजकानं त्या-त्या क्षेत्रातील अनुभवी व्यावसायिकच नोकरीसाठी ठेवणं योग्य असतं.

वाढत्या उद्योगासाठी पुरेशा प्रमाणात भांडवल उभं करणं गरजेचं असतं. त्यासाठी बँकेकडून किफायतशीर व्याजदरात कर्ज घेणं, एखाद्या उद्योग समूहाचं किंवा गुंतवणूकदाराचं सहकार्य मिळवून यांच्याबरोबर ‘जॉईंट व्हेंचर’ म्हणजे भागीदारी करणं किंवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी बनवलेल्या सरकारी योजनांतून पैसे घेणं यांसारखे पर्याय उपलब्ध असतात. आपल्यासाठी कोणता पर्याय सर्वोत्तम ठरेल, याचा दूरदृष्टीने विचार करून उद्योजक योग्य पर्याय निवडतो.

उद्योगाचा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विकास करण्यासाठी सरकारी परवानग्या, परवाने, सोयी आणि सवलती मिळवाव्या लागतात.

हे सर्व यशस्वीरीतीनं पार पडल्यावर लहान उद्योजक एक प्रथितयश उद्योगपती बनतो. उद्योगपतीकडे संपत्ती आणि प्रतिष्ठा असते. केवळ स्वत:च्याच उद्योगावर नव्हे, तर एकूणच देशातल्या आणि कित्येक वेळा आंतरराष्ट्रीय उद्योग विश्वावरसुद्धा प्रभाव टाकण्याइतका तो यशस्वी झालेला असतो.

उपलब्ध संधी ओळखून त्यावर नियोजनपूर्वक परिश्रम केल्यास

इच्छाशक्ती असलेला कोणीही माणूस उद्योजक आणि नंतर उद्योगपतीसुद्धा होऊ शकतो. आपल्यासमोर संधी कधीही, कोणत्याही रूपात येऊ शकते. आपलाच एखादा गुण किंवा कौशल्य आणि इतर लोकांची गरज यांची योग्य सांगड घातली, तर आपणही यशस्वी उद्योजक आणि उद्योगपती होऊ शकतो.

पिअर ओमिडायर नावाच्या एका कम्प्युटर प्रोग्रामेरला स्वत: जवळचं नको असलेलं सामान विकायचं होतं, म्हणून त्यानं एक वैयक्तिक वेबसाईट बनवली आणि त्यावर त्या सामानाची लिस्ट टाकली. आजूबाजूच्या लोकांनी ती वेबसाईट बघितली. त्यांना ती सोयीस्कर वाटली, म्हणून तेसुद्धा आपल्या जवळचं विकायचं सामान त्या वेबसाईटवर टाकू लागले. त्या वेबसाईटवर विक्रीचं सामान नोंदवणाऱ्यांची संख्या वाढते आहे, हे बघून ओमिडायरनं त्या वेबसाईटवर सामान नोंदवणाऱ्या व्यक्तींना शुल्क आकारायला सुरुवात केली. आज तीच वेबसाईट सात लाख कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल करणारी 'इबे' ही जगप्रसिद्ध कंपनी बनली आहे.

आज जग विलक्षण वेगानं पुढे सरकत आहे. आरोग्य, करमणूक, शिक्षण, उद्योग या सर्वच क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. तंत्रज्ञान आणि मार्केटिंग यांनी स्वत:ची एक उंची गाठली आहे. स्वत:चं जीवन समृद्ध आणि आनंदी करण्यासाठी या गतिशीलतेत दडलेल्या संधी समजून घेणं गरजेचं आहे. या सदरात प्रत्येक आठवड्यात आपण या नव्या गतिमान जगात उपलब्ध होत असलेल्या संधींकडे आपल्यातल्याच उद्योजकतेच्या नजरेतून पाहणार आहोत!!

**जनसंपर्काचा सुसंवाद**

एखादी व्यक्ती, कंपनी किंवा संस्था यांच्याबद्दलची माहिती त्या व्यक्ती, कंपनी किंवा संस्थेला फायदेशीर होईल आणि लोकांना उपयुक्त ठरेल, अशा प्रकारे अतिशय नियोजनबद्ध रीतीनं लोकांपर्यंत पोहोचवणं म्हणजे 'जनसंपर्क'. जनसंपर्कामध्ये स्वत:बद्दलची माहिती इतरांपर्यंत पोहचवू इच्छिणारी व्यक्ती, कंपनी किंवा संस्था, सर्वांगीण आणि सखोल विचार करून ती माहिती ज्या लोकांपर्यंत पोहोचवायची आहे, त्या

जनसमूहाबरोबर, योजनापूर्वक संवाद साधते. जनसंपर्क करणाऱ्या व्यक्ती किंवा कंपनीची जनमानसातील प्रतिमा उंचावून त्याचा व्यक्तीची कारकिर्द अधिक पुढे जावी, कंपनीची विक्री आणि समभागांचे भाव वाढावेत किंवा संस्थेला अधिक देणग्या व सोयी-सवलती मिळाव्यात हे जनसंपर्काचे स्पष्ट उद्देश असतात.

आज संवादाची नवी नवी आधुनिक माध्यमं उपलब्ध होत आहेत. या माध्यमांचा उपयोग करून घेत कंपनीची उत्पादनं, महत्त्वाचे निर्णय आणि एकूण प्रगती यासंबंधीची सत्य माहिती लोकांपर्यंत पोहोचवणं आवश्यक झालं आहे. त्यामुळेच अलीकडे सर्वच बहुराष्ट्रीय आणि महत्त्वाकांक्षी भारतीय कंपन्यासुद्धा जनसंपर्कावर विशेष भर देऊ लागल्या आहेत. काही कंपन्या स्वत:चा अंतर्गत 'जनसंपर्क विभाग' सुरू करतात, तर इतर बऱ्याच कंपन्या एखाद्या व्यावसायिक 'जनसंपर्क कंपनी'कडे आपल्या जनसंपर्काची जबाबदारी सोपवतात. व्यावसायिक जनसंपर्क कंपनी वृत्तपत्रं, नियतकालिकं किंवा दूरचित्रवाणी वाहिनी किंवा तत्सम माध्यमांवर आपल्या कंपनीच्या एखाद्या महत्त्वाच्या अधिकाऱ्याची मुलाखत आयोजित करणं, कंपनीचा कारखाना असलेल्या छोट्या शहरात काही लोकोपयोगी उपक्रम राबवून तेथील स्थानिकांचं सहकार्य मिळवणं, कंपनीला उपयोगी ठरतील अशा राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी जवळचे संबंध निर्माण करणं, आपल्या कंपनीच्या प्रतिमेला पूरक ठरेल अशी एखादी क्रीडास्पर्धा किंवा करमणुकीचा कार्यक्रम आयोजित करणं, यांसारख्या अनेक आघाड्यांवर काम करते. इंटरनेटवर खेळले जाणारे 'फॅन्टसी गेम्स' बनवणाऱ्या 'ड्रीम इलेव्हन' या भारतीय कंपनीनं 'बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया' (बी. सी. सी. आय) या आय.पी.एल. क्रिकेट स्पर्धा आयोजित करणाऱ्या संस्थेला तीनशे अठ्ठावन्न कोटी रुपये देऊन २०२३ची आय.पी.एल. स्पर्धा प्रायोजित केली आहे. आय.पी.एल.सारख्या क्रिकेट स्पर्धेशी संलग्न झाल्यावर आपले आभासी खेळ संपूर्ण जगभरातल्या लोकांपर्यंत पोहचतील अशी त्यांची भूमिका आहे. संपूर्ण जगात आपली प्रतिमा उंचावत, जगभरातल्या क्रीडाप्रेमींशी संपर्क करण्याचा हा दूरगामी फायदे करून देणारा

उत्तम मार्ग आहे.

पारंपरिक जाहिरातीसुद्धा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचून त्यातून कंपनीसाठी फायदा मिळवायचा प्रयत्न करतात. या बाबतीत जनसंपर्काचं 'जाहिराती'शी साधर्म्य आहे. परंतु जाहिराती प्रसारित करण्यासाठी माध्यमांना थेट पैसे दिले जातात, तर जनसंपर्कामध्ये संबंधित व्यक्ती किंवा कंपनीबद्दल, लोकांना पाहायला किंवा वाचायला आवडतील, त्यामुळे माध्यमांना प्रसारित करण्यात रस वाटेल अशा बातम्या किंवा लेख तयार केले जातात. मग माध्यमं स्वत:हून त्या बातम्या आणि लेख प्रसारित करतात. त्याबद्दल त्यांना कोणतंही थेट शुल्क दिलं जात नाही. म्हणूनच यशस्वी 'जनसंपर्क' साधण्यासाठी विशेष कौशल्य आणि सफाई आवश्यक असते.

या उद्योगात येऊ इच्छिणाऱ्या उद्योजकांकडे कल्पकता, भाषांवर प्रभुत्व आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व असावं लागतं. जनसंपर्क कंपनी सुरू करण्यासाठी कोणत्याही मोठ्या साधनसामग्रीची गरज नसते. त्यामुळे जनसंपर्क कंपनी कोणत्याही मोठ्या गुंतवणुकीशिवाय सुरू करता येते आणि काही नियमित क्लायंट्स मिळाल्यावर, आपले दैनंदिन खर्च भागवून, ती फायद्यातसुद्धा येते. त्यामुळे अनेक कल्पक तरुण या व्यवसायाकडे वळत आहेत. 'एडलमॅन', 'ऑग्लीव्ही' या अमेरिकन, 'एम.एस.एल.ग्रुप' ही फ्रेंच, तर इंग्लंडची 'ब्रन्सविक ग्रुप' यांसारख्या कंपन्या जनसंपर्क उद्योगामध्ये अग्रेसर मानल्या जातात. २०१९ साली चीनच्या 'ब्लूफोकस कम्युनिकेशन ग्रुप' या कंपनीनं जागतिक जनसंपर्क कंपन्यांच्या यादीत नवव्या क्रमांकाचं स्थान मिळवून चीनसुद्धा या उद्योगात पुढे येतो आहे हे दाखवून दिलं. 'कम्युनिकेट इंडिया' किंवा २०१९ साली आशियामधील सर्वाधिक वेगानं वाढणारी दुसऱ्या क्रमांकाची जनसपंर्क कंपनी, हे पारितोषिक मिळवणारी 'मीडिया मंत्र', यांसारख्या भारतीय कंपन्या जनसंपर्क क्षेत्रात यशस्वी होत आहेत. त्याखेरीज अनेक तरुण उद्योजकांनी मोठ्या - मध्यम शहरात स्थानिक पातळीवर सुरू केलेल्या जनसंपर्क कंपन्यासुद्धा कमीअधिक प्रमाणात यश मिळवत आहेत. आज कॉर्पोरेट कंपन्यांबरोबरच कलावंत, खेळाडू आणि

राजकीय नेतेसुद्धा आपल्या प्रगतीसाठी व्यावसायिक जनसंपर्क कंपन्यांची मदत घेऊ लागले आहेत.

भारतामध्ये जनसपंर्क उद्योगातून गेल्या वर्षी म्हणजे २०२२ साली दोन हजार शंभर कोटी रुपये इतकं उत्पन्न मिळालं. येत्या पाच वर्षात ते दोन हजार आठशे कोटींपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे. जनसंपर्क व्यवसायाची सध्याची जागतिक बाजारपेठ सुमारे आठ लाख कोटी रुपये आहे आणि २०२९पर्यंत ती अकरा लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, अशी अपेक्षा आहे.

सर्वच उद्योगांमधल्या कंपन्यांचा ग्राहक, समभागधारक, सरकार, माध्यमं आणि सामान्य जनसमुदाय या सर्वांशीच कमीअधिक प्रमाणात संबंध येत असतो. त्या सर्वांच्याच मनात कंपनीचे उद्देश, कार्यतत्परता आणि प्रामाणिकपणा याविषयी चांगली प्रतिमा निर्माण करून सर्वांशी अधिकाधिक सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणं कंपनीच्या व्यवहार आणि प्रगतीसाठी आवश्यक असतं. कंपनीला आवश्यक ते परवाने, अनुमती किंवा अनुदानं देण्याचा अधिकार असलेले मंत्री, राजकारणी किंवा प्रशासकीय अधिकारी यांच्या मनात त्या कंपनीची योग्य प्रतिमा निर्माण करून अपेक्षित परवाने देण्यासाठी ती कंपनी सुयोग्य आहे, हे त्या संबंधित अधिकाऱ्याना पटवून देणं हासुद्धा जनसंपर्काचाच एक महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी त्या राजकारणी किंवा अधिकाऱ्याबरोबर वैयक्तिक संबंध निर्माण केले जातात. अधिकाऱ्यावर वेगवेगळ्या प्रकारे प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. ते उचित प्रकारे आणि योग्य मर्यादेत घडलं, तर ते जनसंपर्क व्यवसायाचा भाग म्हणून स्वीकारलं जातं. या सर्वांचा वापर करून कंपनीसाठी आवश्यक ते परवाने मिळवणाऱ्या जनसंपर्क व्यावसायिकाचं व जनसंपर्क कंपनीचं त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल कौतुकसुद्धा केलं जातं. परंतु जर मर्यादा ओलांडली गेली, तर ती जनसंपर्क कंपनी, तिचे क्लायंट्स, संबंधित प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते आणि अगदी मंत्री व सरकारपर्यंतसुद्धा त्याचे परिणाम होतात.

नीरा राडिया या अतिशय उत्कृष्ट जनसंपर्क व्यावसायिक होत्या. त्यांची 'वैष्णवी कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स' ही कंपनी जनसंपर्क व्यवसायातील

अत्यंत कार्यक्षम कंपनी मानली जात असे. अनेक मोठ्या कंपन्यांच्या जनसंपर्काचं काम त्या कंपनीकडे होतं. २००८च्या सुमारास भारत सरकार मोबाइल संभाषणासाठी आवश्यक असलेला '२जी स्पेक्ट्रम' वापरण्याचे परवाने मोबाइल फोन कंपन्यांना देणार होतं. '२जी स्पेक्ट्रम'च्या वाटपाचे अधिकार केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाच्या अखत्यारीत होते. अनेक कंपन्या तो स्पेक्ट्रम मिळवण्यासाठी प्रयत्नशील होत्या. नीरा राडिया त्या वेळी दूरसंचार मंत्रालयाच्या संपर्कात होत्या. आणि एक दिवस अचानक राडिया यांच्या काही मंत्री आणि अधिकाऱ्याबरोबरच्या '२जी स्पेक्ट्रम' संदर्भातल्या संभाषणाच्या टेप्स उघड झाल्या. त्यातून देशभर वादळ उठलं. सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. काही मंत्री, अधिकाऱ्यांची चौकशी झाली. या सगळ्या प्रकरणात गैरव्यवहार झाला नसल्याचा निर्वाळा पुढे न्यायालयानं दिला. तरीही २०१४च्या निवडणुकीत संयुक्त पुरोगामी आघाडीचं सरकार पडण्यामध्ये '२जी स्पेक्ट्रम' आणि नीरा राडिया यांच्या संभाषणाच्या उघड झालेल्या टेप्स हे महत्त्वाचं कारण होतं, असं मानलं जातं. यावरून जनसंपर्क व्यवसायाची व्याप्ती आणि त्या व्यावसायिकांवरची जबाबदारी याची कल्पना येते.

जनसंपर्काची एखादी अत्यंत कल्पक आणि अभिनव कल्पना अपयशात घुटमटळत असलेल्या कंपनीला त्यातून बाहेर काढून पाहता-पाहता यशाच्या शिखरावरसुद्धा पोहोचवू शकते. 'स्टारबक्स' ही कॉफी शॉपची शृंखला २००८च्या सुमारास अचानक तोट्यात आली. कंपनीला जगभरातली जवळपास एक हजार कॉफीशॉप्स बंद करावी लागली. त्या वेळी कंपनीचा मालक हॉवर्ड शुल्ट्झ यानं आपल्या सर्व सल्लागारांना आणि कर्मचाऱ्याना आर्थिक बाबी बाजूला ठेवून जनसंपर्कावर, म्हणजे 'स्टारबक्स'ला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यावर, लक्ष केंद्रित करण्याची सूचना दिली. त्यासाठी कंपनीनं 'माय स्टारबक्स आयडिया' नावाची मोहीम सुरू केली. त्या अंतर्गत सर्वसामान्य माणसांकडून 'स्टारबक्स'मध्ये काय सुधारणा कराव्यात यासंबंधी सूचना मागवण्यात आल्या. जनसंपर्काच्या या अभिनव कल्पनेला लोकांचा उत्तम प्रतिसाद

मिळाला. जवळपास नव्वद हजार लोकांनी आपल्या सूचना स्टारबक्सकडे पाठवल्या. त्या सर्व सूचना समाज माध्यमं आणि इतर माध्यमांद्वारे सर्व लोकांपर्यंत पोहचवल्या जाऊ लागल्या. प्रत्येक महिन्याला जवळपास पन्नास लाख लोक त्या सूचना वाचत होते. आलेल्या सूचनांपैकी जवळपास शंभर सूचना स्टारबक्सनं प्रत्यक्षात अमलातसुद्धा आणल्या. ही मोहीम पुढील काही महिने उस्फूर्तपणे चालत राहिली. स्टारबक्सचा जनसंपर्क वाढत राहिला. त्यातून स्टारबक्सकला नवे ग्राहक मिळत गेले. स्टारबक्सची यशस्वी घोडदौड पुन्हा एकदा सुरू झाली. आज स्टारबक्सची जवळपास अठ्ठावीस  हजार कॉफीशॉप्स संपूर्ण जगात पसरली आहेत.

आपल्याबरोबर विविध प्रकारांनी थेट संपर्क साधत, आपल्या आयुष्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव टाकणाऱ्या कंपन्या, उत्पादनं, संस्था आणि व्यक्ती यांच्यासंबंधी माहिती पुरवणारा हा जनसंपर्क उद्योग येत्या काळात वाढत्या प्रमाणात आणि नव्या- नव्या स्वरूपात आपल्याशी सुसंवाद साधत राहणार आहे.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## द सीक्रेट फ्रेन्ड

**ख्रिस मुनी**

अनुवाद
**प्रकाश गोगटे**

*भय , थरार आणि उत्कंठेचा अनोखा मिलाफ साधत वाचकांना गुंतवून ठेवणारी ख्रिस मुनींची रंगतदार कादंबरी*

डार्बी मॅकोर्मिक कपडे वाळवण्याच्या खोलीमध्ये शेवटचा रक्ताळलेला कपडा धुवून वाळत घालत होती, तोच ध्वनिक्षेपकावरून तिचे नाव पुकारल्याचं तिनं ऐकलं. तिच्या प्रयोगशाळेचे डिरेक्टर लेलंड प्रॅटनी तिला तातडीनं त्यांच्या ऑफिसमध्ये भेटायला बोलावलं होतं.

डार्बीने आपला कोट आणि रबरी हातमोजे उतरवले आणि त्या सेरोलॉजी प्रयोगशाळेच्या बेसिनमध्ये हात धुवायला गेली. साबण चोळता-चोळता तिनं आरशाकडे एक नजर टाकली. तिच्या डाव्या गालावर डोळ्याखाली एक पातळसा दातेरी व्रण तिच्या मेकअप खाली किंचितसा लपला होता. ट्रॅव्हलरच्या छोट्या कुऱ्हाडीने झालेल्या घावावर प्लॅस्टिक सर्जनने संपूर्ण कौशल्य पणाला लावून काम केले होते. रबर बॅन्ड काढल्यावर तिचे पोनिटेलमध्ये बांधलेले भडक लाल केस मोकळे होऊन खांद्यावर रुळू लागले. पेपर टॉवेलला पुसून तिनं हात कोरडे केले आणि खोलीबाहेर पडली.

लेलंडच्या मेजामागे एक सडपातळ आणि एक उत्तम काळा बिझनेस सूट घातलेली स्त्री उभी राहून फोनवर बोलत होती. ती बोस्टन पोलीस कमिशनर ख्रिस्तिना चाझिन्स्की होती.

त्या स्त्रीने फोनवर हात ठेवला.

''माफ करा, पण मी लेलंडला शोधत होते,'' डार्बी म्हणाली, ''त्याने माझ्या नावाची घोषणा केली होती.''

''हो. मला माहीत आहे. आत ये आणि दरवाजा लोटून घे.'' एवढंच म्हणून पोलीस कमिशनर पुन्हा फोनवर बोलू लागली.

ख्रिस्तिना चाझिन्स्की बोस्टन पोलीस कार्यालयात उच्चतम पोलीस कमिशनर पदावर पोचणारी पहिली महिला होती. जेव्हा संभाव्य पोलीस कमिशनर म्हणून पहिल्यांदा तिचे नाव पुढे केले गेले, तेव्हा बोस्टनच्या प्रसारमाध्यमांनी रोक्सबरी, माट्टापन, आणि डॉरचेस्टर अशा प्रामुख्याने गुन्हेगारी असणाऱ्या भागात तिला सामान्य नागरिक आणि बोस्टन पोलीस यामधील दुवा म्हणून मोठ्या आशेने पाहिले होते.

तिच्या मुदतीतल्या तीन वर्षांच्या कारकिर्दीतच गुन्हेगारीचे प्रमाण सर्वांत उच्चतम पातळीवर होते. राजनेत्यांनी चाझिन्स्कीला बळीचा बकरा करायचे ठरवले आणि या कारस्थानात प्रसारमाध्यमे पण फसली. दैनिक स्तंभलेखक आणि तथाकथित माध्यमतज्ज्ञ यांनी तिच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. चाझिन्स्की आपल्या कामात अपयशी ठरली असे त्यांचे

म्हणणे होते, कारण तिने एका माजी इन्व्हेस्टमेन्ट बँकर आणि सध्या पॉवर ब्रोकर असलेल्या, पावेल चाझिन्स्कीबरोबर विवाह केल्यावर तिचा सामान्य नागरिकांशी संपर्क तुटला होता आणि म्हणून ती आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ नव्हती. पावेल चाझिन्स्की बोस्टनच्या राजकीय वर्तुळात सक्रिय होता. तो महापौरपदासाठी उमेदवार म्हणून उभा राहणार असल्याची चर्चा होती.

''मला जावं लागेल,'' असं म्हणून तिने फोन बंद केला. तिने लेलंडला दिलेल्या सरकारी टेबलासमोर असलेल्या दोन ताठ पाठीच्या खुर्च्यांकडे निर्देश केला. ''मिस मॅकोर्मिक, तुम्ही सी.एस.यू.शी परिचित आहात का?''

डार्बीने होकारार्थ मान हलवली. नवीनच स्थापन झालेला 'क्राइम सीन इन्व्हेस्टिगेटिव्ह युनिट' त्यांच्याच विभागातल्या तरबेज तपासनीस व न्यायवैद्यकीय तंत्रज्ञ अशा तज्ज्ञांचा एक गट होता. ते खून, बलात्कार आणि इतर हिंसक प्रकरणांच्या गुन्हेगारीचा तपास करीत. डार्बीने न्याय वैद्यकीय जागेसाठी अर्ज केला होता, पण तिला मुलाखतीलाही बोलावलं नव्हतं.

''एम्मा हेल,'' चाझिन्स्की एक फाइल उघडत म्हणाली, ''मला वाटतं, ती कोण आहे ते तुला माहीत असेल.''

''मी वर्तमानपत्रात या प्रकरणाबद्दल वाचत असते.''

गेल्या वर्षी मार्चमध्ये हार्वर्डची एक नवोदित विद्यार्थिनी आपल्या एका मैत्रिणीच्या पार्टीनंतर गायब झाली होती. आठ महिन्यांनी नोव्हेंबरमध्ये थँक्स गिव्हिंगच्या एक आठवडा आधी तिचे पाण्याने फुगलेले प्रेत, चार्ल्सटाउनमधल्या 'धी ऑयलीस' नावाच्या चार्ल्स नदीच्या काठावर वाहून आले होते. एम्मा हेलच्या डोक्यात पाठीमागून गोळी घालण्यात आली होती. ''ती गोळी आधीच्या प्रकरणातील गोळीशी जुळत नव्हती असं मी समजते.'' डार्बी म्हणाली.

''आम्हाला जुळणारं काही सापडलं नाही.'' चाझिन्स्कीने खास बनवलेल्या महागड्या फ्रेमचा चश्मा चढवला. तिने मेकअप, केशरचना, कपडे आणि दागिन्यावर बराच खर्च केला असावा. तिची हिऱ्याची अंगठीच

निदान ३ कॅरेटची होती.

''जेव्हा एम्मा हेल गायब झाली तेव्हां सी.एस.यू.ला हे प्रकरण अपहरणाचे असावे असे वाटले होते. तिचे वडील जोनाथन हेल खूप श्रीमंत आहेत.'' चाझिन्स्की म्हणत होती, ''आणि मग गेल्या डिसेंबरमध्ये आणखी एक विद्यार्थिनी गायब झाली.''

''जुडीथ चेन.''

''काय झाले ते तुला माहीत आहे?''

''वर्तमानपत्रात आलं होतं की लायब्ररीतून घरी परत जात असताना ती नाहीशी झाली.''

''सी.एस.यू. काही संबंध आहे का याचा तपास करत आहेत.''

''काही संबंध आहे?''

''त्या दोघी कॉलेज विद्यार्थिनी होत्या. एवढाच संबंध आम्हाला माहीत आहे. एम्माच्या कवटीतून काढलेली गोळी इतर कुठल्याही प्रकरणाशी संबंधित नाही. आणि इतका वेळ शरीर पाण्यात असल्यामुळे इतर पुरावे धुतले गेले आहेत. एकच पुरावा शिल्लक आहे तो म्हणजे एक धार्मिक मूर्ती. तू त्याबद्दल वर्तमानपत्रात नक्कीच वाचलं असशील.''

डार्बीने होकारार्थ मान हलवली. निनावी स्रोताकडून मिळाल्याचे सांगून ग्लोब आणि हेराल्ड या दोन्ही वर्तमानपत्रांनी मृताच्या खिशांत अशी धार्मिक मूर्ती मिळाल्याचे छापले होते.

''तू त्या मूर्तीबद्दल काही ऐकलं आहेस कां?'' चाझिन्स्कीने विचारले.

''इथे प्रयोगशाळेत अशी कुणकुण आहे की मूर्ती व्हर्जिन मेरीची होती.''

''हो होती. तू आणखी काय काय ऐकलं आहेस?''

''ती मूर्ती एम्मा हेलच्या खिशांत शिवली होती.''

''हो.''

''एन.सी.आय.सी.चं काय म्हणणं आहे?'' डार्बीने विचारले. एफ.बी. आय.च्या क्रिमिनल जस्टिस इन्फर्मेशन सेन्टरच्या देखरेखीखाली नॅशनल क्राइम इन्फर्मेशन सेन्टरने देशातल्या सर्व गुन्ह्यांची नोंद ठेवली होती आणि

सर्व तपास लागलेल्या आणि न लागलेल्या गुन्ह्यांबद्दलची माहिती इथून मिळत असे. तसेच खून, बेपत्ता इसम, चोऱ्या, फरारी गुन्हेगार, चोरलेला ऐवज याबद्दल इत्थंभूत आणि खात्रीशीर माहितीचा हा एकमेव स्रोत होता.

''व्हर्जिन मेरीची मूर्ती खिशांत शिवून ठेवलेल्या इसमाच्या खुनाबद्दल एन.सी,आय.सी.कडे काहीच माहिती नाही.'' चाझिन्स्की म्हणाली.

''प्रत्यक्ष गुन्ह्याच्या जागी तपास केलेल्या बोस्टन ऑफिसातल्या माणसाशी तू बोललीस का?''

''आम्ही त्याचा सल्ला घेतला.'' खुर्चीला मागे रेलत आणि पायावर पाय चढवत चाझिन्स्की म्हणाली, ''लेलंड मला सांगत होता की नुकतीच तू 'गुन्हेगारीचे मानसशास्त्र' या शोध प्रबंधावर हार्वर्डची डॉक्टरेट मिळवली आहेस.''

''हो.''

''आणि तू एफ.बी.आय.च्या इन्व्हेस्टिगेटीव्ह सपोर्ट युनिटमध्ये अभ्यास केला आहेस.''

''मी काही व्याख्यानांना उपस्थित होते.''

''तो खुनी एक पुरुष आहे असं आपण धरून चालू. त्याने बळी गेलेल्या व्यक्तीच्या खिशांत मूर्ती शिवायला वेळ का घालवला असावा?''

''मला वाटतं प्रत्यक्ष जागेवर तपास करणाऱ्याने त्याचे मत सांगितलेच असेल.''

''त्याने सांगितलेच. पण मला आता तुझे मत ऐकायचे आहे.''

''त्याला अर्थातच व्हर्जिन मेरीचं विशेष महत्त्व वाटत असणार.''

''उघडच आहे,'' चाझिन्स्की म्हणाली, ''अजून काय?''

''ती प्रेम करणाऱ्या आणि काळजी वाहणाऱ्या आईचं पाहिलं व मुख्य प्रतीक आहे.''

''या व्यक्तीला आईबद्दलच्या काही समस्या आहेत, असं तुला म्हणायचं आहे?''

''कुठल्या माणसाला अशा नसतात?''

चाझिन्स्कीने एक फिकट हास्य केलं.

''मारेकऱ्याला कदाचित तिच्याबद्दल काळजी होती,'' डार्बी म्हणाली, ''एम्मा हेलला काही महिने जिवंत ठेवण्यात आलं होतं. ती गायब व्हायच्या दिवशी तिने जे कपडे घातले होते, तेच तिच्या मृतदेहावरसुद्धा होते. आणि तिच्या डोक्यात मागून गोळी घालण्यात आली होती.''

''याला काही महत्त्व असेल असं तुला वाटतं?''

''यावरून असं सूचित होतं की तो एम्मा हेलला सामोरे जाऊ शकत नव्हता आणि तिला मारण्यात त्याला लाज किंवा अपराधी वाटत असावं.''

चाझिन्स्की डार्बीकडे काही सेकंदच रोखून बघत होती; पण डार्बीला ती काही मिनिटे वाटली.

''डार्बी तुला सी.एस.यू.मध्ये घ्यायचय मला. तू तुझ्या प्रयोशाळेतल्या कुणालाही तुझ्याबरोबर सहकारी म्हणून घेऊ शकतेस. तसंच न्यायवैद्यकीय जबाबदाऱ्या सोबतच तू नंबर दोन म्हणूनही या युनिटचं काम बघावंस असं मला वाटतं. तपासाची कामे तू टिम ब्रायसन बरोबर वाटून घे. तू त्याला भेटली आहेस का?''

''फक्त ओझरती ओळख आहे,'' डार्बी म्हणाली. त्याचे लग्न झालेले होते आणि त्याची मुलगी दुर्धर प्रकारच्या ल्युकेमियाला बळी पडली होती या पलीकडे त्याच्याबद्दल तिला काहीच माहिती नव्हती. ब्रायसन त्याबद्दल काहीच बोलत नसे. तो अत्यंत एकलकोंडा आणि कामाव्यतिरिक्त आपल्या सहकाऱ्यांत न मिसळणारा होता. इतर पोलिसांच्या मते त्याने कामाला वाहून घेतले होते आणि त्याचा हाच गुण तिला भावला होता.

''ही एक फारच उत्तम संधी आहे,'' चाझिन्स्की म्हणाली, ''या विभागाच्या इतिहासात तपास आणि चौकशीसाठी न्यायवैद्यकीय प्रभागातील तू पहिली न्यायवैद्यक तंत्रज्ञ असशील.''

''हो! मला त्याची कल्पना आहे.''

''मग मला तुझ्यात अस्वस्थतेचा भास का होतोय?''

''तुम्हाला जर खरोखरीच असे वाटत असेल तर मग माझा पहिला अर्ज का फेटाळला?''

''तुझ्या त्या ट्रॅव्हलरच्या कुऱ्हाडीच्या प्रकरणानंतर विभागाने तुला

समुपदेशाची संधी देऊ केली होती. ती तू नाकारलीस.''

''मला जरूर वाटली नाही.''

''आणि ती का?''

डार्बीने आपले हात मांडीत दुमडून घेतले. तिने काहीच उत्तर दिले नाही.

''तू त्या हादरवणाऱ्या प्रसंगातून बचावलीस,'' चाझिन्स्की म्हणत होती, ''काही लोकांना वाटलं...''

''कमिशनर, मी मोठ्या आदराने सांगते की मला इतर लोक काय म्हणतात याच्याशी काही देणंघेणं नाही.''

चाझिन्स्कीच्या ओठांवर एक आदरयुक्त स्मित उमटलं. ''तू ट्रॅव्हलरला पकडलंस. तो तीन दशकं गुंगारा देत पळत होता. एफ.बी.आय.च्या निष्णात लोकांना तो सापडला नाही. पण तुला सापडला. हा अनुभव मला इथे कामी येईल.''

''मला सर्व माहिती हवी, गुन्ह्याच्या तपासाचे सर्व रिपोर्ट, शवविच्छेदनाचे अहवाल आणि छायाचित्रे.''

''माहितीची सारी कागदपत्रे टिम तुला आजच पोचवील.''

''हे तू टिमला सांगितले आहेस?''

''मी सांगितले आहे. त्याचा अहंकार दुखावला गेला आहे, पण ठीक आहे. तुला माहीत आहे पुरुष कसे असतात ते.'' एक खट्याळ हास्य तिच्या चेहऱ्यावर उमटले. ''उपलब्ध असलेले जे काही थोडे पुरावे आहेत ते वेगळ्या दृष्टिकोनातून बघितले तर या दोन्ही प्रकरणात फायदा होऊ शकेल. प्रयोगशाळेतून तू आणखी कुणाची शिफारस करशील?''

''कूप आणि कीथ वूडबरी.'' डार्बी म्हणाली.

''कूप... म्हणजे जॅक्सन कूपर तुझा प्रयोग शाळेतला सहकारी?''

''हो.'' जॅक्सन कूपर त्या विभागात 'कूप' म्हणून ओळखला जायचा. कूप फक्त डार्बीचा चांगला मित्रच नव्हता, तर तिच्या आईच्या निधनानंतर तिच्या कुटुंबाच्या सर्वांत जवळचा होता. ''कूप ट्रॅव्हलर प्रकरणात पण सहभागी होता. त्याच्या मदतीचा उपयोग होईल.''

‘‘मला मिस्टर वूडबरी माहीत नाहीत.’’

‘‘कीथ काहीच महिने आमच्या बरोबर आहे. तो आमचा न्यायवैद्यकीय रसायन शास्त्रज्ञ आहे.’’ एका नुकत्याच घडलेल्या गोळीबाराच्या प्रकरणात डार्बीने त्याच्या बरोबर काम केले होते. कसून काम कारायच्या वूडबरीच्या पद्धतीवर काही शंकाच नव्हती. तिला भेटलेल्या हुशार लोकांपैकी तो एक होता.

‘‘मग त्यांना बोलाव. मला त्यांचं या टिममध्ये स्वागत करायचं आहे,’’ चाझिन्स्की म्हणाली.

‘‘कूप आज सुट्टीवर आहे आणि कीथ एका परिसंवादासाठी वॉशिंग्टनला गेला आहे.’’

‘‘मग तूच त्यांना ही आनंदाची बातमी दे,’’ चाझिन्स्की म्हणाली. आपल्या सोन्याच्या पेनने तिने बिझनेस कार्डच्या पाठीमागे लिहिलं.

‘‘मला प्रयोगशाळेत आणखी काही साधनं लागतील,’’ डार्बी म्हणाली.

‘‘तुला मिळतील. मी लेलंडशी चर्चा केली आहे. त्याचा तुला पूर्ण पाठिंबा आहे.’’


चाझिन्स्कीने बिझनेस कार्ड टेबलावरून तिच्याकडे सरकवलं. ‘‘सर्वांत वरचा नंबर माझ्या सेल फोनचा आहे. टिमचे नंबर त्याच्या खाली आहेत. तो तुझ्या फोनची प्रतीक्षा करत असेल. तुला आणखी काही प्रश्न?’’

‘‘तूर्तास काही नाही.’’

‘‘मग तू सुरुवात करू शकतेस.’’ कमिशनरने फोन उचलून नंबर फिरवायला सुरुवात केली.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# ॲन इनकम्प्लीट लाइफ

**विजयपत सिंघानिया**

अनुवाद

**दीपक कुळकर्णी**

*विमान उड्डाण असो वा हॉट एअर बलून, आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या अवलिया उद्योगपतीची जीवनगाथा ...*

### माझं कुटुंब

पवित्र गंगेच्या तीरावर राहणाऱ्या सिंघानिया कुटुंबात मी वाढलो. आमचं एकत्र कुटुंब होतं. कुटुंबातील प्रत्येक जण जे. के. समूहाशी निगडित होता. माझे पणजोबा लाला जुग्गीलालजी आणि माझे आजोबा लाला कमलपतजी, या दोघांवरून कंपनीला नाव दिलं होतं.

त्यांचा व्यापारी बँकेचा व्यवसाय होता. वचनपत्रं (प्रॉमिसरी नोट्स) आणि मागणीपत्र (डिमांड नोट्स), यांच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार ते करत आणि खरेदी-विक्रीच्या किमतीमधील फरक, हाच त्यांच्या धंद्यातील नफा असे. या सर्व व्यवहारांची ज्या खतावणीमध्ये नोंद व्हायची, तिला मारवाडी समाजाच्या प्रचलित भाषेत 'वही खाता' असं म्हटलं जाई. माझ्या पिढीपासून आम्ही घरामध्ये प्रामुख्याने हिंदीत बोलू लागलो.

राजस्थानमध्ये 'सिंघन' नावाचं एक छोटं खेडं आहे. सिंघानियांचं हे मूळ गाव; पण मूळ गाव असूनही आमच्या कुटुंबातील कुणालाच तिथे कधी जावंसं वाटलं नाही. मला मात्र सिंघनबद्दल खूप ओढ वाटायची. म्हणून मी मुद्दाम तिथे जाऊन राहिलो; पण माझा अपेक्षाभंग झाला. तिथे मला आलेला अनुभव फारसा सुखावह नव्हता. सिंघानिया कुटुंबाने गावासाठी काहीच केलं नाही, हे तिथे राहणाऱ्या प्रत्येकाने मला ऐकवलं. गावकऱ्यांचा आमच्या कुटुंबावर रोष होता. बिर्ला हेदेखील मारवाडी समाजातील आमच्यासारखंच एक प्रतिष्ठित घराणं; परंतु जेव्हा त्यांचा व्यवसायात भाग्योदय झाला, तेव्हा ते आपल्या मूळ गावाला विसरले नाहीत. सिंघन गावातील लोकांनी माझ्या कुटुंबाला दिलेली दूषणं ऐकणंही मला अखेर असह्य झालं. मी गाव सोडून कानपूरला आलो आणि तिथेच कायमचा राहिलो. फार पूर्वी सिंघनला माझी खापरपणजी राहायची. ती इतकी धीट आणि धूर्त होती, की एकदा तिने आमच्या घरावर हल्ला करण्यासाठी आलेल्या डाकूंच्या टोळीला हुशारीने रोखलं होतं. त्या काळी दरोडेखोर नियमितपणे गाव लुटायला येत आणि कधीकधी तर ते येण्याची पूर्वसूचनाही देत. माझ्या खापरपणजीने डाकूंपासून कायमची सुटका मिळवण्यासाठी एक विलक्षण शक्कल लढवली. एके दिवशी दरोडेखोर घरात घुसले असताना तिने टोळीच्या सरदारासमोर लाडवांचं ताट आणून ठेवलं. ते पाहून सरदार चकित झाला; पण साजूक तुपाचा मारवाडी लाडू खाण्याचा मोह तो आवरू शकला नाही. माझ्या खापरपणजीने त्या लाडवांमध्ये खारट शेव मिसळली होती. लाडू तोंडात टाकताच टोळीचा म्होरक्या खवळला. आपल्याबरोबर आलेल्या डाकूंना तो म्हणाला, की 'आपण हे घर लुटू शकत नाही; कारण मी या घराचं मीठ खाल्लंय.' 'हमने इस घरका नमक खाया है।' तो हिंदीत बोलला. आणि म्हणाला, 'यामुळे या घराला माझं कायम संरक्षण

लाभेल.’ त्या काळचे लोक खूपच दयाळू आणि तत्त्वनिष्ठ होते. मीठ हा पदार्थ तेव्हा दुर्मिळ असल्यामुळे सर्वांच्या मनात मिठाला आदर आणि मान असायचा. माझे आजोबा कमलपत सिंघानिया म्हणजे अत्यंत उत्साही आणि चैतन्यदायी व्यक्तिमत्त्व! त्यांना एखाद्या मल्लासारखी शरीरयष्टी लाभली होती. सहा फुटांहून अधिक उंची, पीळदार शरीर आणि सैनिकाला शोभतील अशा दाट मिश्या. ते दररोज न चुकता दोन तास व्यायाम करत. त्यांच्या अंगात इतकी ताकद होती की लहान मुलांबरोबर खेळताना ते आपल्या डाव्या हातात एक मोठा भोपळा ठेवत आणि त्यात आपल्या उजव्या हाताचा अंगठा इतक्या जोराने खुपसत की तो भोपळा फुटून त्याचे तुकडे चहूकडे विखरून पडत. जेव्हा त्यांच्या नवीन सूतगिरणीच्या इमारतीचं बांधकाम सुरू होतं, तेव्हा ते कामाच्या देखरेखीसाठी सकाळी सहा मैल पायी चालून तिथे पोहोचत व पूर्ण दिवस तिथे राहून संध्याकाळी पुन्हा चालत घरी येत.

ज्यावेळी आमचा कौटुंबिक व्यवसाय अगदीच बाल्यावस्थेत होता, तेव्हा माझे आजोबा रणरणत्या उन्हात कापडाचे गठ्ठे डोक्यावर वाहून ते विकण्यासाठी कित्येक किलोमीटर्स पायी जात, व्यवसायवृद्धीसाठी त्यांनी अपार परिश्रम घेतले. ते कापडाचे सुटे कटपिस विकत आणि लोक त्यापासून त्यांना हवे तसे कपडे शिवून घेत. माझे आजी-आजोबा अत्यंत शिस्तप्रिय आणि कष्टाळू होते. परिस्थितीशी संघर्ष करत ते खडतर जीवन जगले. आणि म्हणूनच आज आम्हाला त्यांच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमान वाटतो.

आज भरभराटीला आलेल्या आमच्या व्यवसायाचा पाया रचण्याचं काम त्यांनी केलं. आम्ही त्यांचा वारसा आमच्या परीने पुढे चालवण्याचा प्रयत्न करतोय. साधासरळ स्वभाव आणि खानदानी वृत्ती, यामुळे प्रत्येक जण आजोबांना आदर आणि मान देई, ते समोर दिसले की लोक मान झुकवून त्यांना प्रणाम करत. त्यांच्या शब्दाला आजच्या कायदेशीर करारनाम्याहून जास्त किंमत होती. लोक त्यांना हा मान भीतीपोटी देत नसत तर त्यांच्या कर्तृत्वाला मिळालेली ती पावती होती. १९३७ साली म्हणजे माझ्या जन्माच्या एक वर्ष आधी ते निवर्तले. माझ्या आई-वडिलांकडून मी त्यांच्या अनेक प्रेरणादायक कहाण्या ऐकल्या आहेत. ते कट्टर देशभक्त होते. ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या ‘चले जाव’ आणि इतर आंदोलनांतही त्यांनी सक्रिय भाग घेतला. इंग्लंडचा

राजा पंचम जॉर्जबद्दल त्यांच्या मनात तीव्र घृणा होती. त्या काळी चलनात असलेल्या चांदीच्या नाण्यांवर राजा जॉर्ज यांची प्रतिमा मुद्रांकित केलेली असायची. माझे आजोबा अनेकदा आपल्या अंगठ्याने ती प्रतिमा खरवडून काढत. जुग्गीलाल आणि कमलपत यांनी कलकत्ता, मिर्झापूर आणि फरिदाबाद इथे कंपनीची प्रादेशिक कार्यालये सुरू करून भविष्यात उभारल्या जाणाऱ्या एका महाकाय उद्योगसमूहाची जणू मुहूर्तमेढच रोवली. या तीनही कार्यालयांत स्वतंत्र व्यवस्थापक नेमले होते. वर्षभरातील उत्पन्नाचा हिशेब घेण्यासाठी ते तिघांनाही वर्षातून एकदा कानपूरला बोलावून घेत. बरेचसे व्यवस्थापक हे लबाड आणि फसवे असतात, हे ठाऊक असल्यामुळे त्यांच्याकडून खरा हिशेब मिळवण्यासाठी त्यांनी एक भन्नाट क्लृप्ती शोधली होती. आजच्या काळात मात्र ती पद्धत बेकायदेशीर आणि दंडनीय ठरेल. त्यावेळी आमच्या घरातील अनेक खोल्यांमध्ये दरवाज्याच्या वर एक माळा बनवलेला असे. माल किंवा वस्तू संचयासाठी त्या माळ्याचा उपयोग केला जाई. एखादा व्यवस्थापक खोटा हिशेब सादर करतोय अशी जर माझ्या आजोबांची आणि पणजोबांची खात्री पटली, तर ते त्याला एक-दोन दिवस माळ्यावर डांबून ठेवत आणि त्यानंतर त्याला खाली आणून पुन्हा खरा हिशेब देण्याची संधी देत आणि तरीही त्याने दिलेली उत्पन्नाची रक्कम त्यांना पटली नाही तर पुन्हा त्याची माळ्यावर रवानगी होई. जेके कंपनीने नेमका किती नफा कमावलाय, याचं अचूक उत्तर मिळेपर्यंत त्या व्यवस्थापकाची या शिक्षेतून सुटका होत नसे.

आपल्या धंद्यावर बारीक नजर ठेवण्याची ही त्या काळची पद्धत होती. काही काळानंतर त्या कंपनीचे रूपांतर जुग्गीलाल कमलपत बँकर्स नावाच्या कौटुंबिक भागीदारी संस्थेत करण्यात आलं. ते आता हुंड्यांचा व्यवहार करू लागले. हुंडी हा एक बिनशर्तींचा लेखी करार असतो. एक व्यक्ती दुसरीला हुंडीमध्ये नाव लिहिलेल्या माणसाला विशिष्ट रक्कम देण्याचा निर्देश करते. आज यालाच वचनपत्र (प्रॉमिसरी नोट) म्हटलं जातं. हुंडीचा व्यवहार यशस्वी होण्यासाठी विश्वासाची आणि विश्वासार्हतेची आवश्यकता असते. कमलपत सिंघानियांची बाजारपेठेत इतकी पत होती की त्यांची हुंडी त्या काळी इम्पिरिअल बँकही (नंतरची स्टेट बँक) स्वीकारत असे आणि त्याबदल्यात लगेच पैसेही देत असे. माझ्या कुटुंबातील सर्वांनाच याचा सार्थ अभिमान होता.

◆

# अभिप्राय




## केतकरवहिनी

**उमा कुलकर्णी**

किंमत : ३२०/-
पृष्ठे : १९२

### जिगरबाज केतकरवहिनींचा खडतर, प्रेरणादायी प्रवास

मालतीबाई माधवराव केतकर म्हणजेच 'केतकरवहिनी.' त्यांच्या खडतर; पण प्रेरणादायी आयुष्याचा हा प्रवास. लेखिका उमा कुलकर्णी यांनी तो ओघवत्या शब्दांत या पुस्तकातून वाचकांपर्यंत पोहोचविला आहे. गेल्या शतकाचा पूर्वार्ध, शहरातील मुलगी लग्नानंतर कोकणातील दुर्गम खेड्यात जाते. तेथे संकटाला पाठ न दाखवता लढत-झगडत राहणाऱ्या केतकरवहिनीची ही कहाणी.

यात गेल्या शतकातील स्त्री-जीवन आणि तिची

आंतरिक शक्ती यांचा वेध घेतला आहे. करंबवणे ही वहिनींची कर्मभूमी ठरली. मालाडहून मोठ्या बोटीने दाभोळची खाडी, तेथून गोवळकोटला जाणारी लहान बोट.

वसिष्ठी नदीच्या काठावर हे दुर्गम खेडेगाव. बोटीतून उतरून बराच पायी प्रवास. अशा आडबाजूच्या खेड्यात वहिनीचे लग्न झाले. सुरुवातीस सुखाचे दिवस गेले; पण पतीच्या हत्येनंतर त्या धाडसी बनल्या. पती आणि सासरे यांनी नोंद केलेल्या माहितीवरून शेतजमिनीची माहिती करून घेतली. कायदे समजून घेतले. आधी कुळांना एका वर्षासाठी मक्तेचिठ्ठी दिली जायची. जमीन-मालक कुळाला एका वर्षासाठी विशिष्ट खंड द्यायच्या बोलीवर जमीन कसायला देत असत. काही कारणाने कूळ खंड देऊ शकला नाही, तर मालक ती जमीन परत घेत असत. स्वातंत्र्यानंतर सुरक्षित कूळकायदा अस्तित्वात आला.

केतकर म्हणजे तेथील खोत. अनेक जमिनींचे ते मालक होते.

माधवराव केतकर यांची तेथील असंतुष्ट कुळांकडून हत्या केली जाते. पुराव्याअभावी सगळे कूळ निर्दोष सुटतात आणि या कुटुंबाला भीती घालण्याचे प्रकार केले जातात. कालांतराने सासू-सासऱ्यांचेही निधन होते. आता मालतीबाईची खरी लढाई सुरू होते. दुर्गम परिसर, मदतीला कोणी नाही आणि जमिनीचे वाद सुरू. मुलांना शिक्षणासाठी शहरात पाठविलेले. सोबतीला होता धुवांधार पाऊस, घनदाट झाडी, साप, विंचू आणि असंख्य अडचणी, एकटी बाईमाणूस. तिलाही घाबरवून टाकले की, जमिनी आपल्याच, हा विचार करणारे कूळवाडी; पण ज्या हक्कासाठी, ज्या जमिनीसाठी पतीची हत्या झाली, सासरे थकले, तिथे माघार घ्यायची नाही, या जिद्दीने दिलेला हा लढा प्रेरणादायी आहे. आयुष्यभरात शंभर-दीडशे जमिनींच्या संदर्भातील लहान खटले आणि वीस-पंचवीस मोठे खटले त्या लढल्या व जिंकल्या. त्यांनी पुढे आपल्या जमिनींपैकी बराच भाग मुलांच्या वसतिगृहासाठी दिला. गावापर्यंत एसटी यावी, म्हणून पाठपुरावा केला. त्यासाठी शेवटचा टप्पा म्हणून आपली शेतजमीन दिली. ज्या जमिनीसाठी त्या लढल्या, ती जमीन चांगल्या कामासाठी, तितक्याच सहजतेने दान केली.

**- हेमांगी जाधव, चिंचवड**

◆

## १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर, २०२५ दरम्यानचे दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१८ ऑगस्ट - गुलज़ार यांचा जन्मदिन**

'त्रिवेणी', 'रावीपार', 'गुलज़ार पटकथा', 'धागे' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२५/- । सवलत किंमत २९८/-**

**१९ ऑगस्ट - सुधा मूर्ती यांचा जन्मदिन**

'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'अस्तित्व', 'आयुष्याचे धडे गिरवताना', 'बकुळा', 'डॉलर बहू', 'गरुडजन्माची कथा', 'गोष्टी माणसांच्या', 'हरवलेल्या मंदिराचे रहस्य', 'कल्पवृक्षाची कन्या', 'महाश्वेता', 'परीघ', 'पितृऋण', 'सुकेशिनी आणि इतर कथा', 'थैलीभर गोष्टी', 'वाइज अँड अदरवाइज', 'स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...', 'पुण्यभूमी भारत', 'सामान्यांतले असामान्य', 'सर्पाचा सूड', 'आजी-आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी', 'तीन हजार टाके', 'त्रिशंकू', 'दोन शिंगे असलेला ऋषी', 'हरवलेल्या गोष्टीचे रहस्य', 'गोपीची डायरी', 'आजोबांच्या पोतडीतल्या गोष्टी', 'सुधा मूर्तींच्या बालकथा', 'गोपीची डायरी : एक उनाड दिवस', 'द सर्कल ऑफ लाइफ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६८८५/- । सवलत किंमत ५१६४/-**

**१९ ऑगस्ट - जॅक कॅनफिल्ड यांचा जन्मदिन**

'चिकन सूप' मालिकेतील ६१ पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२५०/- । सवलत किंमत ९८७९/-**

**१९ ऑगस्ट - फ्रॅन्क मॅककोर्ट यांचा जन्मदिन**

'अँजेलाज ॲशेस' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत २८९/-**

**२० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन**

'नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य', 'अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५१५/- । सवलत किंमत ३४२/-**

**२० ऑगस्ट - एस. एल. भैरप्पा यांचा जन्मदिन**

‘पर्व’, ‘वंशवृक्ष’, ‘काठ’, ‘आवरण’, ‘मंद्र’, ‘पारखा’, ‘तडा’, ‘तंतू’, ‘परिशोध’, ‘सार्थ’, ‘उत्तरकांड’, ‘साक्षी’, ‘गृहभंग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५९०५/- । सवलत किंमत ४४२७/-**

---

**२१ ऑगस्ट - ब्रॅड थॉर यांचा जन्मदिन**

‘ब्लॅक लिस्ट’, ‘फुल ब्लॅक’, ‘यूज ऑफ फोर्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६००/- । सवलत किंमत ११२०/-**

---

**२३ ऑगस्ट - नेल्सन डेमिल यांचा जन्मदिन**

‘द लायन्स गेम’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२४ ऑगस्ट - अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ यांचा जन्मदिन**

‘मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स’, ‘टिअर्स ऑफ द जिराफ’, ‘द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी’, ‘द फुल कबर्ड ऑफ लाइफ’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**२५ ऑगस्ट - तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन**

‘लज्जा’, ‘फेरा’, ‘निर्बाचित कलाम’, ‘नष्ट मेयेर नष्ट गद्य’, ‘निर्बाचित कबिता’, ‘आमार मेयेबेला’, ‘उधाण वारा’, ‘फरासि प्रेमिक’, ‘द्विखंडित’, ‘शोकोलग्रिह हारालोजार’, ‘भाबनागुलो’, ‘बेशरम’, ‘चुंबन’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४१०९/- । सवलत किंमत ३००९/-**

---

**२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फोरसाइथ यांचा जन्मदिन**

‘नो कम बॅक्स’, ‘द अफगाण’, ‘द फिस्ट ऑफ गॉड’, ‘मध्यस्थ’, ‘द ओडेसा फाइल’, ‘द किल लिस्ट’, ‘द डे ऑफ द जॅकल’, ‘आयकॉन’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७२५/- । सवलत किंमत २४९५/-**

---

**२५ ऑगस्ट - पुरुषोत्तम अग्रवाल यांचा जन्मदिन**

‘नाकोहस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२६ ऑगस्ट - नॅन्सी यी फान यांचा जन्मदिन**

‘तलवारीचा शोध’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९०/- । सवलत किंमत ९५/-**

**२९ ऑगस्ट - धिरेंद्र मेहता यांचा जन्मदिन**

‘छावणी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४९/-**

**२९ ऑगस्ट - इनग्रिड बर्गमन यांचा जन्मदिन**

‘माय स्टोरी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

**३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांचा जन्मदिन**

**संच १ -** ‘मृत्युंजय’, ‘छावा’, ‘छावा’ (इंग्रजी), ‘युगंधर’, ‘मृत्युंजय’(नाटक), ‘छावा’(नाटक), ‘मोरावळा’, ‘कांचनकण’, ‘शेलका साज’, ‘अशी मने असे नमुने’, ‘कवडसे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८२९/- । सवलत किंमत २७६८/-**

**संच २ -** ‘मृत्युंजय’, ‘छावा’, ‘युगंधर’ (हार्ड बाउन्ड)

**संचाची मूळ किंमत २१९५/- । सवलत किंमत १५८७/-**

**खालील संचांवर १ ते १५ सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१ सप्टेंबर - कुंदन तांबे यांचा जन्मदिन**

‘नाना आणि महादजी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-**

**२ सप्टेंबर - नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन**

‘चाकाची खुर्ची’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५१/-**

**२ सप्टेंबर - शुभदा गोगटे यांचा जन्मदिन**

‘अस्मानी’, ‘चला जाणून घेऊ या! फेंग शुई’, ‘चला जाणून घेऊ या! सुख’,

‘घर’, ‘हृदयविकार निवारण’, ‘निरामय यशासाठी ध्यान’, ‘सांधा बदलताना’, ‘वसुदेवे नेला कृष्ण’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७१०/- । सवलत किंमत ११९७/-**

**२ सप्टेंबर - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**

‘अर्थाच्या शोधात’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १७३/-**

**३ सप्टेंबर - जी. बी. देशमुख यांचा जन्मदिन**

‘कुलामामाच्या देशात’, ‘अ-अमिताभचा’, ‘महारुद्र’, ‘छाटितो गप्पा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९७०/- । सवलत किंमत ७२७/-**

**५ सप्टेंबर - जागतिक शिक्षक दिन**

‘टू सर, विथ लव्ह’, ‘चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स’, ‘स्टोन्स इन्टू स्कूल्स’, ‘थ्री कप्स ऑफ टी’, ‘मी मलाला’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७१०/- । सवलत किंमत ९७२/-**

**६ सप्टेंबर - नितीन बापट यांचा जन्मदिन**

‘आंधळा न्याय’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**८ सप्टेंबर - लीना सोहोनी यांचा जन्मदिन**

‘अनुवादातून अनुसर्जनाकडे’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत २७८/-**

**१० सप्टेंबर - डॉ. एम. बी. कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘शब्दचर्चा’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-**

**१० सप्टेंबर - नील डोनाल्ड वॉल्श यांचा जन्मदिन**

‘संवाद परमेश्वराशी - भाग २’, ‘संवाद परमेश्वराशी - भाग ३’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५२९/-**

**१० सप्टेंबर - विजया जहागिरदार यांचा जन्मदिन**

'कर्मयोगिनी (इंग्लिश)' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४५/-**

'कर्मयोगिनी (मराठी)' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६२०/- । सवलत किंमत ४३४/-**

**१० सप्टेंबर - सुनील दांडेकर यांचा जन्मदिन**

'आगमन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १८९/-**

**१० सप्टेंबर - प्रा. पुरुषोत्तम रामदासी यांचा जन्मदिन**

'डेस्टिनेशन', 'बाईची गोष्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ५४८/-**

**१२ सप्टेंबर - बिभूतिभूषण बॅनर्जी यांचा जन्मदिन**

'पथेर पांचाली' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

**१३ सप्टेंबर - रॉय मॉक्झॅम यांचा जन्मदिन**

'असा लुटला भारत' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २६३/-**

**१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन**

'विटाळ', 'चावडी', 'जागल्या', 'पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६३५/-**


**१५ सप्टेंबर - स्टीफन ऑल्टर यांचा जन्मदिन**

'हिमालयारण्यक' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४८८/-**

◆

पुस्तक प्रकाशन समारंभ
क्षणचित्रे




डॉ. सुनीलकुमार लवटे लिखित

# SCIENCE OF READING

डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके
यांनी भाषांतरित केलेले

# १००वे पुस्तक



**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/08/2025 Posting Date : 11/08/2025

## आवर्जून वाचावं

# द नागा स्टोरी






**धर्म, तपश्चर्या आणि मृत्यूच्या पलीकडचं जीवन – 'द नागा स्टोरी' कादंबरीतून उलगडेल एक अनोखं आध्यात्मिक रहस्य**

लेखक : **सुमन बाजपेयी**
अनुवाद : **मंजिरी धामणकर**

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________
____________________
____________________
____________________
____________________
____________________
____________________